
सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ८१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. १८ एप्रिल २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि एलॉन मस्क यांच्यात चर्चा; टेस्लाची भारतातील एन्ट्री पक्की?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नवी दिल्ली**



फेब्रुवारी महिन्यात भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि टेस्लाचे संस्थापक एलॉन मस्क याची अमेरिकेत भेट झाली होती. या भेटीनंतर टेस्ला कंपनी भारतात मोठी रोजगार निर्मिती करणार असल्याची चर्चा सुरू झाली. आता त्यातील पुढचं पाऊल म्हणजे मोदी आणि एलॉन मस्क यांच्यात पुन्हा एकदा फोनवरून चर्चा झाली असून तंत्रज्ञान आणि नवोपक्रमाच्या क्षेत्रातील कामाबाबत या दोघांमध्ये चर्चा झाली. यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवरून माहिती दिली.


पंतप्रधान नरेंद्र मोदी एक्सवर म्हणाले, मी आज एलॉन मस्क यांच्याशी संवाद साधला असून वॉशिंगटनच्या भेटीत ज्या मुद्द्यांवर चर्चा झाली होती, त्यावर संवाद साधण्यात आला. तंत्रज्ञान आणि नवोपक्रमाच्या क्षेत्रात एकत्र काम करण्याच्या प्रचंड क्षमतेवर आम्ही चर्चा केली. भारत या क्षेत्रात अमेरिकेसोबतची भागीदारी आणखी मजबूत करण्यास पूर्णपणे तयार आहे.

फेब्रुवारी महिन्यात एलॉन मस्क आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट झाल्यानंतर एलॉन मस्क भारतात मोठी नोकरभरती करणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. त्यांच्या लिंक्डइन प्रोफाईलनुसार त्यांनी कस्टमर सर्व्हिस आणि बॅकएंड पदांसाठी भरती सुरू केली होती. यापैकी पाच पदे मुंबई आणि दिल्ली या महत्त्वाच्या शहरांमधून भरण्यात येणार होती. या नोकरभरतीच्या वृत्तानंतर एलॉन मस्क यांच्या स्टारलिंकने भारती एअरटेल आणि जिओबरोबर करार केला होता. त्यानुसार एअरटेलने भारतातील ग्राहकांसाठी स्टारलिंकची हाय-स्पीड इंटरनेट सेवा आणण्यासाठी एलॉन मस्कच्या स्पेसएक्ससोबत करार केला आहे. एअरटेलने एका निवेदनात म्हटले आहे की, भारतातील हा पहिला करार आहे. यामुळे स्पेसएक्सला भारतात स्टारलिंकची उपकरणे विकण्यासाठी परवानगी देण्यात आली.

## रणजित कासलेला स्वारगेटच्या हॉटेलमधून अटक

### वाल्मिक कराडच्या एन्काउंटरचा केला होता दावा; महानिरीक्षकांनी केले बडतर्फ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ पुणे**





निलंबित झालेला पोलिस उपनिरीक्षक रणजित कासले शरण आला नसतानाच त्याला पुण्यातील एका हॉटेलमधून अटक करण्यात आली आहे. निलंबनानंतर त्याने सोशल मीडियावर व्हिडिओ टाकून थेट मुख्यमंत्री आणि एसपींवर आरोप केले होते. वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरसाठी आपल्याला ५० कोटींची ऑफर मिळाल्याचा दावाही त्याने केला होता. त्यानंतर आपण शरण जाणार असल्याचेही त्याने म्हटले होते. मात्र, तो शरण आला नव्हता. अखेर कासले याला स्वारगेटच्या हॉटेलमधून अटक करण्यात आली आहे. दरम्यान पोलिस महानिरीक्षकांनी कासले याला बडतर्फ करत त्याच्यावर कारवाई देखील केली आहे.

कासले बीडच्या सायबर पोलिस ठाण्यात कार्यरत होता. एका गुन्ह्यात वरिष्ठांची परवानगी न घेता गुजरातमध्ये जाऊन आर्थिक तडजोड केल्यामुळे त्याला निलंबित केले होते. निलंबनानंतर त्याने सोशल मीडियावर व्हिडिओ टाकून थेट मुख्यमंत्री आणि एसपींवर आरोप केले होते. वाल्मीक कराडच्या एन्काऊंटरसाठी ५० कोटींची ऑफर मिळाल्याचा दावाही त्याने केला होता.

**रणजित कासले कालच पुण्यात दाखल**

निलंबित पोलिस अधिकारी रणजित कासले कालच पुण्यात दाखल झाले होते. यावेळी पत्रकारांशी बोलताना त्यांनी अनेक मोठे दावे केले होते. मतदानाच्या दिवशी दहा लाख रुपये ईव्हीएमपासून दूर राहण्यासाठी दिले होते, असा दावा कासले यांनी केला आहे. तसेच एन्काउंटरची सर्व चर्चा बंद दाराआड झाली असल्याचे देखील त्यांनी यावेळी सांगितले होते.

## विद्यार्थ्यांप्रमाणे शिक्षकही शाळेत गणवेशात येणार; ड्रेस कोडबाबत शिक्षणमंत्र्यांचे विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मालेगाव**



शिक्षण क्षेत्रातील एक महत्त्वाची बातमी हाती आली आहे. राज्यातील सर्व शालेय शिक्षकांना गणवेश लागू करण्यात येणार आहे. शालेय शिक्षकांना राज्यात ड्रेसकोड लागू होणार, असं शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी सूतोवाच केले आहे. 'ड्रेसकोडसाठी शासन निधी उपलब्ध करुन देणार असल्याचंही त्यांनी म्हटलंय. मालेगाव तालुक्यातील अजंग येथील शाळेला त्यांनी भेट दिली होती. त्यानंतर माध्यमांशी बोलताना त्यांनी हे सुतोवाच केले आहे.

त्यामुळे आता विद्यार्थ्यांसोबत शिक्षकही गणवेशात दिसणार आहेत. राज्यातील काही शाळांमधील शिक्षकांना ड्रेसकोड आहे. तर काही जिल्ह्यातील शाळांमध्ये गणवेश नाही, त्यामुळे सरकार सर्वच शाळांमधील शिक्षकांना गणवेश अनिवार्य करणार असल्याचं शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी म्हणाले.

अजंगमधील शाळेत एका कार्यक्रमात बोलताना भुसे म्हणाले, राज्यातील शिक्षकांनाही गणवेशात यावे लागेल. त्यासाठी सरकारकडून निधी उपलब्ध करून दिला जाईल. यावेळी शिक्षणमंत्र्यांनी अजंगच्या शाळेच्या व्यवस्थापनावर कौतुकाची थाप दिली आणि तेथील शिक्षकांचं कौतुक केलं. अजंगच्या शाळेतील शिक्षक हे गणवेशात आले होते, त्यामुळे दादाजी भुसे यांनी अजंगच्या शिक्षकांचं कौतुक केलं.

राज्यातील सर्व शालेय शिक्षकांना ' ड्रेसकोड ' लागू करणार असून त्यासाठी खारीचा वाटा म्हणून शासन निधी देखील उपलब्ध करून देणार असल्याचे सुतोवाच शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी केले. नाशिकच्या मालेगाव तालुक्यातील अजंग येथील जिल्हा परिषद शाळेत ओएनजीसी व अवंत फाऊंडेशनच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी ( CSR ) अंतर्गत विद्यार्थ्यांना शैक्षणिक डेस्कसह शाळेच्या बॅगचे वितरण करण्यात आले यावेळी मंत्री भुसे बोलत होते.

शिक्षकांना ड्रेसकोड लागू झाल्यास पुढील काळात विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकही गणेवशात दिसणार आहेत. विद्यार्थ्यांना दर्जेदार व आनंददायी शिक्षण मिळावे यासाठी शासन शिक्षण विभागाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवत आहे. विद्यार्थ्यांनी नियमित शाळेत उपस्थित राहून ज्ञानार्जन करावे, पालकांनी मुलांशी संवाद साधावा आणि शाळांनी सहलींसारखे उपक्रम राबवावेत, असेही मंत्री भुसे यांनी यावेळी आवाहन केले.

## आपले सरकार पोर्टवरील सेवा देण्यास दिरंगाई झाल्यास कारवाई

### दरदिवशी बसणार १००० रुपयांचा दंड, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**



आपले सरकार पोर्टलवर अधिसूचित सेवा उपलब्ध करण्यात दिरंगाई करणाऱ्या प्रशासकीय विभाग प्रमुखांना दरदिवशी १ हजार रुपयांचा दंड लावण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबतचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता आपले सरकार पोर्टलवरील शासकीय सेवा अधिक गतीने होणार आहेत. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

या बैठकीत सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या आपले सरकार पोर्टलच्या तक्रारी आणि त्यावर होत असलेल्या कारवाईच्या अनुषंगाने चर्चा झाली. राज्य शासनाने सेवा हक्क अधिनियमांतर्गत १०२७ सेवा अधिसूचित केल्या असून त्यापैकी ५२७ सेवा 'आपले सरकार' पोर्टलवर उपलब्ध आहेत. सर्वसामान्य नागरिकांना शासकीय सेवा पुरवण्यासाठी आणि सरकारी कार्यालयातील येणाऱ्या अडचणींच्या तक्रारी करण्यासाठी सरकारने आपले सरकार पोर्टल व मोबाईल ॲप ही सेवा सुरू केली आहे.

या बैठकीत आदिवासी विकास विभागाच्या विविध योजना, आपले सरकार पोर्टलवरील अधिसूचित सेवा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे कार्यान्वयन, ॲग्रीस्टॅक उपक्रम यांचा आढावा मुख्यमंत्र्यांनी घेतला. आपले सरकार पोर्टलवर विविध विभागांच्या १३८ इंटिग्रेटेड सेवा ३१ मे २०२५ पर्यंत उपलब्ध करून देण्यात याव्यात, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी सचिवांना दिल्या आहेत. तसेच उर्वरित ३०६ अधिसूचित सेवा १५ ऑगस्टपर्यंत ऑनलाईन कराव्यात, असेही यावेळी निर्देश देण्यात आले आहेत.

'आपले सरकार' हा महाराष्ट्र शासनाचा एक उपक्रम आहे, ज्याचा उद्देश नागरिकांना विविध शासकीय सेवा अधिक पारदर्शक, सुलभ आणि कार्यक्षम पद्धतीने ऑनलाइन उपलब्ध करून देणे आहे. या पोर्टलच्या माध्यमातून नागरिक जन्म, मृत्यू, उत्पन्न आदी प्रमाणपत्रे, परवाने व अन्य अनेक सेवा घरबसल्या अर्ज करून मिळवू शकतात. तसेच, यात एक तक्रार निवारण यंत्रणाही समाविष्ट आहे, जिच्या साहाय्याने नागरिक त्यांच्या समस्या व तक्रारी संबंधित सरकारी विभागांपर्यंत पोहोचवू शकतात. 'आपले सरकार' पोर्टल आणि मोबाईल ॲपद्वारे या सेवा उपलब्ध असून, यामुळे नागरिकांची सरकारी कार्यालयांना वारंवार भेट देण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी होते आणि प्रशासनाशी थेट संपर्क सुलभ होतो.

## हिंदी ही देशाची राष्ट्रभाषा, त्यामुळे ती लोकांना आली पाहिजे; भाजपा नेते चंद्रशेखर बावनकुळेंचं मोठं विधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नागपूर**



राज्य शालेय अभ्यासक्रम आराखडा २०२४ नुसार महाराष्ट्रात पहिलीपासूनच हिंदी ही भाषा अनिवार्य करण्यात आली असून, केंद्र सरकारच्या नव्या त्रिभाषा सूत्रानुसार महाराष्ट्रात इयत्ता पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा हा निर्णय घेण्यात आला आहे, मात्र या निर्णयाला मराठी भाषाप्रेमींसह विविध क्षेत्रांमधून तीव्र विरोध आहे. शिक्षणामध्ये पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याला विरोध होत असतानाच भाजपाचे नेते आणि राज्य सरकारमधील महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मोठं विधान केलं आहे. हिंदी ही देशाची राष्ट्रभाषा असल्यामुळे हिंदीसुद्धा लोकांना आली पाहिजे, त्यामुळे नव्या शिक्षण धोरणातून हिंदी भाषा अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

पहिलीपासून हिंदी भाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयाविरोधात मनसेने घेतलेल्या आक्रमक भूमिकेबाबत विचारले असता चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मराठी ही आपली भाषा आहे. मातृभाषा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काही काळापूर्वी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे. आपण प्रत्येकजण मराठी बोलतो. तसेच महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेलाच प्राधान्य आहे. मात्र हिंदी ही आपली राष्ट्रभाषा आहे. हिंदी ही राष्ट्रभाषा असल्याने तीसुद्धा लोकांना आली पाहिजे.

बावनकुळे यांनी पुढे सांगितले की, मराठीला आपलं प्राधान्य असलंच पाहिजे. मात्र हिंदी राष्ट्रभाषा असल्याने ती पुढच्या पिढीला आली पाहिजे, यासाठी नव्या शिक्षण धोरणात करण्यात आलेला अंतर्भाव हा महत्त्वाचा आहे, असे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

## अपघातग्रस्त रूग्णांना १ लाखांपर्यंत कॅशलेस उपचार; फडणवीस सरकारचा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मुंबई**




अपघातग्रस्त रुग्णांना मिळणार १ लाख रुपयांपर्यंतचे कॅशलेस उपचार देण्याचा निर्णय फडणवीस सरकारने घेतला आहे. आरोग्य विभागाच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या वरळी, मुंबई येथील मुख्यालयात आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनांच्या कामकाजाचा आढावा आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर घेतला.

रूग्णालयांची माहिती, बेडची उपलब्धता आणि तक्रारींसाठी स्वतंत्र मोबाईल ॲपदेखील तयार करण्यात येणार आहे. .याशिवाय दर महिन्याला प्रत्येक रूग्णालयानं आरोग्य शिबीर घेऊन किमान पाच रूग्णांवर कॅशलेश उपचार करणं बंधनकारक असणार आहे. अशा शिबिरात लोकप्रतिनिधींना सहभागी करून घेऊन त्याची पूर्वप्रसिद्धी करावी, असे आरोग्यमंत्री श्री.आबिटकर यांनी यावेळी सांगितले. योजनेच्या अंमलबजावणीसाठी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरावर समित्या स्थापन करून त्यांच्या बैठका त्वरित आयोजित करण्यात येणार आहे.

रुग्णांना वेळेवर दर्जेदार तसेच कॅशलेस उपचार मिळावेत यासाठी रुग्णालये, सोसायटीचे अधिकारी व अंमलबजावणी संस्थांना कठोर दक्षता बाळगावी. यात गैरप्रकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल असे स्पष्ट निर्देश आबिटकर यांनी प्रशासनाला दिले आहेत. बैठकीत आबीटकर यांनी आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनांच्या कामकाजाचा आढावा घेतला. आयुष्मान कार्ड वाटप मोहिमेस गती देण्यासाठी आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, रेशन दुकानदार आणि नागरी सेवा केंद्रांच्या माध्यमातून वाटप करण्याची योजना आखण्यात आली आहे. या कार्यासाठी त्यांना मिळणाऱ्या मानधनात वाढ करण्याचे निर्देशही आरोग्यमंत्र्यांकडून देण्यात आले.

## हिंदी सक्तीविरोधात मनसे 'मराठी जागर परिषद' भरवणार, राज ठाकरेंचे बैठकीत आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८मुंबई**



राज्य सरकारने शाळांमध्ये हिंदी भाषा अनिवार्य केल्यानंतर मराठी भाषिक अस्मितेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक भूमिका घेतली असून, राज्यभरात 'मराठी जागर परिषद' घेण्याचा निर्णय मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी घेतला आहे.

गेल्या बैठकीत राज ठाकरे यांनी पक्ष पदाधिकाऱ्यांना स्पष्ट आदेश दिले की, हिंदी भाषा सक्तीच्या निर्णयाचा जोरदार विरोध करण्यात यावा, आणि याचबरोबर मराठी भाषेचा जागर प्रत्येक विभागात करण्यात यावा.राज्याच्या सर्वच विभागांमध्ये मनसेतर्फे मराठीच्या प्रचारासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. 'मराठी जागर परिषद' हे या मोहिमेचे केंद्रबिंदू ठरणार असून, त्यामार्फत हिंदी अनिवार्य केल्याच्या विरोधात जनजागृती केली जाणार आहे.

## संपादकीय ......

# संधींच्या नव्या युगात भारत

ट्रम्प यांनी चीनच्या आयातीवर १४० टक्क्यांपेक्षा अधिक टॅरिफ आकारणी करणे हा अमेरिका-चीन यांच्या आर्थिक संबंधातील महत्त्वाचा क्षण आहे. त्याचा व्यापक प्रभाव अनेक उद्योगांवर पडेल आणि ही बाब अमेरिकी उत्पादन आणि ग्राहकांसाठी कळीचा मुद्दा ठरणारी आहे. आज अमेरिकाच नव्हे, तर जगभरातील देश चीनवरचे अवलंबित्व कमी करण्याचा विचार करत असताना भारत हा जगातील देशांना चांगला पर्याय म्हणून सिद्ध होऊ शकतो.कोरोनानंतरच्या काळात संपूर्ण जग एकप्रकारे चीनवरचे अवलंबित्व कमी करण्यासाठी धडपड करत आहे. अशावेळी भारतातील राजकीय स्थैर्य, धोरणात्मक सातत्य आणि व्यापक क्षमता या गोष्टी जगाला पर्याय म्हणून विचार करावयास लावणार्या ठरू शकतात. भारताची योग्य दिशेने होणारी सर्वंकष प्रगती यात महत्त्वाचे योगदान देत आहे. अलीकडेच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जागतिक व्यापार परिषदेत व्यापक बदल घडवून आणला. त्यांनी 'अमेरिका फर्स्ट' या धोरणानुसार व्यापक टॅरिफची घोषणा केली. जागतिक विरोधानंतर आणि वाटाघाटींची तयारी दर्शवल्यानंतर हा निर्णय ९० दिवसांसाठी स्थगित करण्यात आला; पण चीनवर १२५ टक्के टॅरीफ आकारणी कायम ठेवली. दुसरीकडे भारताच्या उत्पादनावर आकारलेले १० टक्के आयात शुल्कदेखील तूर्त मागे घेतले. या घटनांचे आकलन करता जागतिक धोरणात बचावात्मक मुद्दा हा अधिक प्रकर्षाने जाणवत आहे; पण भारताचा विचार केला, तर जागतिक भूराजकीय स्थितीत प्रचंड उलथापालथ दिसत असतानाही संधीदेखील दिसत आहे. कारण, भारताकडे अशा घडामोडींवर तोडगा काढण्याची रणनीती आहे.

प्रारंभीच्या घोषणेनुसार ट्रम्प यांनी भारतावर २६ टक्के शुल्क आकारणी केली. त्याचवेळी व्हिएतनाम, बांगला देश आणि चीनवर भारतापेक्षा अधिक आयात शुल्क आकारले; पण यात बदल केला आहे. ट्रम्प यांनी ७० देशांवरील शुल्कवाढ तूर्त स्थगित करताना चीनवरची शुल्कवाढ मात्र दीडशे टक्क्यांच्या दिशेने नेली आहे. तसेच अमेरिकेने काही देशांवर भारतापेक्षा कमी शुल्क आकारले असले, तरी त्यांची विविध क्षेत्रांतील निर्यात भारताएवढी नाही; पण या गोष्टी आता तीन महिन्यांसाठी तरी टळल्या आहेत. एकंदरीतच सध्याची आणि भविष्यातील स्थिती तसेच मनुष्यबळाच्या आधारे भारत अन्य देशांच्या तुलनेत दीर्घकालीन प्रगतीसाठी चांगल्या स्थितीत आहे आणि तो फायदा घेऊ शकतो. भारताचा जागतिक बाजारात हिस्सा वाढत असताना अमेरिकी ग्राहक याअनुषंगाने आपल्या स्रोतांच्या रणनीतीचा आढावा घेत आहे. जगभरातील देश चीनवरचे अवलंबित्व कमी करण्याचा विचार करत असताना भारत हा जगातील देशांना चांगला पर्याय म्हणून सिद्ध होऊ शकतो.

इलेक्ट्रॉनिकसारख्या क्षेत्रात आशियायी देश प्रगती करत असून या कारणामुळे चीन आणि व्हिएतनामसारख्या देशांना अधिक शुल्काचा सामना करावा लागू शकतो. एकमेकांच्या गरजा भागविण्यासाठी विकसित देशही विकसनशील देशांची मदत घेत आहेत. ॲपलचे एक मोठे उदाहरण देता येईल. अमेरिकेतील वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी टाटा इलेक्ट्रॉनिक्ससारखी भारतीय कंपनी ॲपलला सहकार्य करत आहे. अशा प्रकारे भारत आपल्या भूमिकेची व्याप्ती वाढवू शकतो. परकी कंपन्यांना भारताच्या प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेटिव्ह योजनेत सहभागी करून त्यांना प्रोत्साहन देता येऊ शकते. या माध्यमातून उत्पादन क्षेत्रात भारत एक प्रमुख केंद्र म्हणून नावारूपास येईल.चीनचे अमेरिकेतील इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या आयातीत २७ टक्के आणि मशिनरी आयातीत १६ टक्क्यांपेक्षा अधिक वाटा आहे. हे क्षेत्र अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाचे आहे. सबब, चीनला एकटे पाडणे किंवा जबर शुल्क आकारणे उपयुक्त ठरणारे नाही. अशावेळी राजकीय चर्चा होणे अपेक्षित आहे; मात्र करारानंतरही दीर्घकालीन परिणामापासून दूर राहता येणार नाही. भूराजकीय जोखीम कमी करण्यासाठी अमेरिकेतील उद्योग महामंडळे आपल्या स्रोतांत वैविध्यपणा आणण्यासाठी प्रयत्न करतील. यादृष्टीने भारत हा एक चांगला आणि उपयुक्त पर्याय राहू शकतो. अमेरिका हा भारताचा सर्वात मोठा व्यापारी सहकारी असून गेल्या दहा वर्षांत उभय देशांतील संबंध वृद्धिंगत झाले आहेत.


अमेरिकेच्या बाजारात स्थान मिळवण्यासाठी भारताला सातत्याने संधी मिळत आहे. त्याचेळी चीनला प्रत्युत्तर म्हणून संतुलित राखण्यासाठी १.४ अब्ज लोकसंख्या असलेल्या भारताची अमेरिकेला गरज आहे आणि तसे प्रयत्नही होत आहेत. संघर्षाऐवजी अमेरिकेसमवेत तातडीने संवाद सुरू करायला हवा अणि यादृष्टीने भारताने रणनीतीपूर्वक स्वत:ची स्थिती मजबूत केली आहे. लाभदायी करार पदरात पाडून जागतिक व्यापारात एक विश्वासू सहकारी म्हणून भारत समोर येऊ शकतो.

# राज्यात सुरु होणार नवीन ६५ कृषी उत्पन्न बाजार समित्या

## अमरावती जिल्ह्यात भातकुली, चिखलदरा मध्ये होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती** – पणन विभागामार्फत पुढील १०० दिवसांत करावयाच्या कृती कार्यक्रमाचे मा. मुख्यमंत्री महोदयांसमोर केलेल्या सादरीकरणावेळी राज्यात एकूण ३५८ तालुक्यांपैकी ६८ तालुक्यामध्ये बाजार समित्या अस्तित्वात नाहीत. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील तरतूदीनुसार मा. मुख्यमंत्रीबाजार समिती योजने अंतर्गत तालुका स्तरावर नवीन बाजार समित्या स्थापन करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल. असे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे विधानमंडळाच्या २०२५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनावेळी मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणात एक तालुका एक बाजार समिती योजना ची घोषणा करण्यात आली आहे.त्या अनुषंगाने, राज्यातील एकूण ३५८ तालुक्यांपैकी ६८ तालुक्यांमध्ये बाजार समिती अस्तित्वात नसल्याने प्रत्येक तालुक्यासाठी किमान एक स्वतंत्र बाजार समिती स्थापन करण्याकरिता मुख्यमंत्री बाजार समिती योजना राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. राज्यात एकूण ३५८ तालुक्यांपैकी ६८ तालुक्यामध्ये बाजार




समित्या अस्तित्वात नसल्याने मुंबई उपनगर जिल्ह्यातील ३ तालुके वगळून उर्वरित ६५ तालुक्यांमध्ये महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ मधील तरतूदीनुसार मा. मुख्यमंत्री बाजार समिती योजने अंतर्गत तालुका स्तरावर नवीन बाजार समित्या स्थापन करण्याचा तत्वतः निर्णय घेण्यात आला आहे.

**६५ तालुक्यांची जिल्हानिहाय यादी खालीलप्रमाणे**

**सिंधुदुर्ग :** कणकवली, वैभववाडी, देवगड, मालवण, सावंतवाडी, वेंगुर्ले, दोडामार्ग.

**रत्नागिरी :** संगमेश्वर, लांजा, राजापूर, चिपळूण, गुहागर, दापोली, मंडणगड, खेड.

**रायगड :** उरण, टाळा, सुधागड-पाली, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हासळा.

ठाणे : अंबरनाथ.

पालघर : तलासरी, जवाहर, मोखाडा, वाडा, विक्रमगड.

**नाशिक :** पेठ, त्र्यंबकेश्वर.

**जळगाव :** एरंडोल, मुक्ताईनगर, भडगाव.

**अमरावती:** भातकुली, चिखलदरा.

पुणे : वेल्हा.

**नागपूर :** नागपूर ग्रामीण.

भंडारा : मोहाडी, साकोली.

**गोंदिया :** सालेकसा.

**गडचिरोली :** धानोरा, मुलचेरा, देसाईगंज, कुरखेडा, कोर्ची, एटापल्ली, भामरागड.

**चंद्रपूर :** बल्लारपूर, जिवती.

**नांदेड :** अर्धापूर.

**छ. संभाजीनगर :** खुलताबाद, सोयगांव.

**बीड :** शिरुर कासार.

**सोलापूर :** सोलापूर दक्षिण.

**सातारा :** महाबळेश्वर.

**सांगली :** कवठे महाकांळ, जत, कडेगाव.

**कोल्हापूर :** पन्हाळा, शाहुवाडी, कागल, राधानगरी, गगनबावडा, भुदरगड, चंदगड, आजरा. उपरोक्त ६५ तालुक्यांमध्ये शासन निर्णयात दिलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून प्रत्येक तालुक्याकरिता एक बाजार समिती निर्माण करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

# मोसंबी व संत्रा पिकावरील कोळी किडींवर या करा उपाययोजना

कृषी विशेष

**दि.१८विदर्भ प्रजासत्ताक**

मराठवाड्यातील जालना आणि औरंगाबाद या जिल्ह्यात मोसंबीचे क्षेत्र अधिक आहे. तर परभणी जिल्ह्यात संत्रा बागा आहेत. हवामानात झालेल्या बदलामुळे आता मोसंबीवर कोळी किडींचा प्रादुर्भाव आढळून येत आहे. यावरील उपायायोजना काय आहेत ते वाचा सविस्तर

मोसंबीवर कोळी किडींचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर आढळून आला आहे. परभणी जिल्ह्यात संत्रा बागांचे मोठे क्षेत्र असून, येथे संत्र्यांवर कोळी कीड दिसून येत आहे. अन्य जिल्ह्यातही लिंबूवर्गीय बागेमध्ये या किडींचा प्रादुर्भाव वाढताना दिसत आहे.

प्रादुर्भावाची लक्षणे ओळखून योग्य त्या उपाययोजन कश्या कराव्यात ते वाचा सविस्तर

**प्रादुर्भावाची लक्षणे** कोळी कीड पाने व फळांचा पृष्ठभाग खरवडतात. त्यातून येणाऱ्या रस शोषतात. परिणामी, पानावर पांढूरके चट्टे पडतात. जास्त प्रादुर्भाव असल्यास चट्ट्याचा भाग वाळतो.फळावरील नुकसान तीव्र स्वरुपाचे असते. खरचटलेल्या जागी पेशींची वाढ खुंटते. तपकिरी लालसर किंवा जांभळट रंगाचे चट्टे पडतात. याला शेतकरी 'लाल्या' म्हणून ओळखतात.


शेतकरी ते थेट ग्राहक

**कामधेनु नॅचरल्स**

उत्तम आहार सर्वोत्तम जीवन

विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी

समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती

नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०





**असे करा व्यवस्थापन**

कोळी किडीचा प्रादुर्भाव प्रामुख्याने मोसंबी, संत्रा या लिंबूवर्गीय पिकांच्या फळावर होतो.प्रादुर्भाव लवकर लक्षात न आल्यास प्रादुर्भावग्रस्त फळांचा रंग बदलतो.

**पाण्याचा ताण पडू देऊ नये.**

निंबोळी अर्क (५%) किंवा अझाडिरेक्टीन (१० हजार पीपीएम) ३ ते ५ मि.लि. प्रति लिटर या प्रमाणे फवारणी करावी.

रासायनिक नियंत्रणासाठी, फवारणी प्रति लिटर पाणी डायफेनथीयूरोन (५० डब्ल्यूपी) २ ग्रॅम किंवा विद्राव्य गंधक ३ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी, आवश्यकता भासल्यास दुसरी फवारणी १५ दिवसांच्या अंतराने करावी.

**सौजन्य :** फलोत्पादन पिकावरील किड रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉर्टसॅप), किटकशास्त्र विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी)



# आहारातून जपा डोळ्यांचे आरोग्य; डाएटमध्ये करा 'हे' बदल

**दि.१८ विदर्भ प्रजासत्ताक**

आजकाल धकाधकीचे जीवन, फास्टफूडचा वाढता वापर, लॅपटॉप, मोबाईल, संगणकाचा वाढता वापर या सर्वांचा परिणाम डोळ्यांच्या आरोग्यावर होत आहे. डोळ्यांचे आरोग्य सुधारायचे असेल तर विशिष्ट जीवनसत्वयुक्त आहार घेण्याची गरज आहे. जाणून घेऊया या जीवनसत्वांबाबत...



**अ जीवनसत्व :** डोळ्यांच्या आरोग्यासाठी सर्वात महत्त्वाचे असे हे जीवनसत्त्व आहे. यामुळे डोळ्यांत ओलावा कायम राहतो. पालक, गाजर, हिरव्या पालेभाज्या, शिमला मिरची याचा जेवणात समावेश करून तुम्ही अ जीवनसत्त्व मिळवू शकता.

**ब जीवनसत्त्व :** दृष्टी चांगली राहण्यासाठी जीवनसत्त्व ब १ व ३, ब ६ व ब १२ ची शरीराला गरज असते. हिरव्या पालेभाज्या, दूध, दही, सूर्यफुलाच्या बिया यातून बी जीवनसत्त्व मिळते.

**क जीवनसत्त्व :** डोळ्यांसह एकूण शरीराच्या आरोग्यासाठी क जीवनसत्त्व महत्त्वाचे आहे. हे एक शक्तिशाली अँटी ऑक्सिडंट आहे ज्यामुळे डोळ्याचे नुकसान टळते. यासाठी आवळा, संत्री, पपई, द्राक्षे, कलिंगड या फळांचा समावेश तुम्ही आहारात करू शकता.

**ई जीवनसत्त्व :** अँटी ऑक्सिडेंटस् व फ्री रॅडिकल्सच्या संतुलनासाठी ई जीवनसत्त्व महत्त्वाचे ठरते. यासाठी तुम्ही आहारात हिरव्या पालेभाज्या, सुका मेवा, सोयाबीन तेलाचा समावेश करू शकता.

**ड जीवनसत्त्व :** ड जीवनसत्त्वामुळे डोळ्यांची जळजळ कमी होते. डोळे कोरडे होण्यापासून तसेच मोतिबिंदूपासून बचाव होतो. कोवळ्या सूर्यप्रकाशात बसून तुम्ही ड जीवनसत्त्व मिळवू शकता. तसेच गायीचे दूध किंवा सोया मिल्कमधून तुम्ही ड जीवनसत्त्व मिळवू शकता.

# अमरावती शहरात वाहतूक बदल; बडनेऱ्याकडे जाणारा मार्ग महिनाभर बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८बडनेरा–** अमरावती शहर आणि बडनेरा शहराला जोडणाऱ्या जुन्या बायपास मार्गावरील रेल्वे गेटजवळ रेल्वे पुलाचे बांधकाम सुरू आहे. या कामामुळे वाहतूक कोंडी होऊ नये, यासाठी आजपासून पुढील एक महिन्यासाठी या मार्गावर वाहतुकीसाठी प्रवेशबंदी करण्यात आली आहे. पोलीस उपायुक्त (मुख्यालय) कल्पना बारवकर यांनी याबाबत अधिसूचना जारी केली आहे.बगीया टी पॉइंट ते अलमास गेट (बडनेरा) या दरम्यान सर्व प्रकारच्या वाहनांना १७ एप्रिल ते १७ मे २०२५ पर्यंत प्रवेश बंद राहील.**पर्यायी मार्ग:** यवतमाळकडून येणारी जड वाहने: यवतमाळ वाय पॉइंट मार्गे अकोला वाय पॉइंट – कोंडेश्वर टी पॉइंट – बगीया टी पॉइंट किंवा राममेघे कॉलेज चौक – बगीया टी पॉइंट या मार्गाचा वापर करू शकतील.

**हलकी प्रवासी वाहने (चारचाकी व दुचाकी):**अलमास गेट – नेमाणी गोडाऊन मार्गे




अमरावती शहरात प्रवेश करू शकतील.बगीया टी पॉइंट – द प्राईम पार्क – एमआयडीसी रोड मार्गे अमरावती शहरात ये-जा करता येईल.अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर मोटर वाहन कायदा १९८८ नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल . नागरिकांनी वाहतूक पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# कला माणसाला ठेवते – डॉ भोजराज

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती**

कला माणसाला जिवंत ठेवते आणि माणुसकी शिकवते. कलचे संपूर्ण समाज सामाजिक, आध्यात्मिक विकास साधू, असे विचार विद्यापीठातील प्रादेशिक कला विभाग समन्वयक डॉ. भोजराज चौधरी यांनी व्यक्त केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील जीवन अध्ययन व विस्तार विभाग आयोजित स्नेहसंमेलनाचे (युवा जल्लोष २०२५) उद्घाटनीय भाषण करताना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी एम. ए.कोन्सिलिंग व सायकोथेरपीचे डॉ. सुरेश रहाते, विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. सुरेश रहा म्हणाले, कलाकाराने कलते समाज विकासात दिला पाहिजे. डॉ. श्रीकांत पाटील विद्याथ्र स्नेसंमेलनात सहभागींनी आवाहन केले.

सांस्कृतिक कार्यक्रमाची कु. दीक्षा सरदार हिने




गायिलेल्या गणेश वंदनेने बोले. विभागातील आठही, एकांकिका विद्याथ्रू वादन, नृत्य, नाटक, नाटक कला प्रकार आपली कला सादर केली. योगाच्या भागीदारी विद्याथ्र्यांनी नृत्याच्या योग प्रात्यक्षिक सादर केले. तसेच एम. ए. शिवाजी महाराज विचार व प्रशासनाच्या विद्याथ्र्यांनी माँ जिजाऊँ शिवाजी राजे यांना दिलेली शिकवण व संस्कार पोवाडा व नाटकाची भूमिका सादर केली.

समरोपीय सत्राच्या अध्यक्षस्थानी विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, प्रमुख अतिथी म्हणून विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजीव बोरकर, डॉ. पंजाबराव देशमुख विभागीय अर्थशास्त्र अध्ययन व नियमन केंद्र समन्वयक डॉ. महेंद्र मेटे उपस्थित होते. डॉ. महेंद्र मेले यांनी स्नेहसंमेलनाच्या यशस्वीतेबद्दल मुलाखती घडते. डॉ. राजीव बोरकर यांनी उपस्थितांना विनंती केली आहे की गीत गायनाने सर्वांची मला गेली आहे. अशा प्रकारच्या स्नेहसंमेलना शोध विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत असल्याचे ते म्हणाले. स्नेहमेलनाला विभागातील सर्व परिवारवृद, शिक्षक कर्मचारी, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucngmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर

सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. १८ एप्रिल २०२५

शहर/ग्रामिण




### अमरावतीचे डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने सकारात्मक पाऊल

## महानगरपालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांना 'एआय'चे प्रशिक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती** – राज्य शासनाच्या १०० दिवसीय विशेष उपक्रमांतर्गत अमरावती महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सुयोग्य माहिती तंत्रज्ञानाचा प्रशासनातील प्रभावी वापर' या विषयावर आधारित प्रशिक्षण महापालिकेच्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात देण्यात आले.

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाविषयी समाजमाध्यमांवर सध्या अनेक सकारात्मक आणि नकारात्मक मतप्रवाह दिसत आहेत. मात्र, आता हे तंत्रज्ञान केवळ भविष्यातील कल्पना न राहता, प्रत्यक्ष प्रशासकीय कामकाजाचा एक आवश्यक भाग बनत आहे.एआय म्हणजे संकट नव्हे, तर तो आपला स्मार्ट सहकारी आहे, जो कार्यालयीन कामकाज अधिक जलद, सुलभ आणि अचूक बनवतो. त्यामुळे प्रत्येकाने तंत्रज्ञानस्नेही होणे ही काळाची गरज आहे. एआयचा योग्य वापर करून महानगरपालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांनाआपण आपल्या कामाची गुणवत्ता आणि परिणामकारकता निश्चितच वाढवू शकतो. तंत्रज्ञानाबद्दलचे गैरसमज दूर करून, त्याची अचूक समज घेतल्यास ते आपल्याला अधिक सक्षम बनवू शकते, असे मत महानगरपालिका आयुक्त सचिन कलत्रे यांनी याप्रसंगी व्यक्त केले.



महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता हे भविष्यातील प्रशासनाचे बळ आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाशी परिचित करण्यात येत आहे. हे कौशल्य भविष्यातील पारदर्शक,गतिमान आणि लोकाभिमुख प्रशासनासाठी उपयोगी ठरेल. याशिवाय, हे प्रशिक्षण डिजिटल भारत मिशनच्या उद्दिष्टांशी सुसंगत असून, अमरावती महानगरपालिका डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने सकारात्मक पाऊल टाकत आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना नव्या युगातील प्रशासनासाठी तयार ठेवणे ही काळाची गरज आहे.महानगरपालिकेच्या नागरी सेवा सुविधांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून प्रशासन अधिक गतिमान, कार्यक्षम व नागरिक केंद्रित बनविण्याच्या दृष्टीने प्रत्येक अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करावा, यासाठी घेण्यात आलेल्या प्रशिक्षणामध्ये देवेंद्र पाथरे रिजनल को-ऑर्डिनेटर (महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड), भारतेश गुप्ते असिस्टंट रिजनल को-ऑर्डिनेटर (महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड), जयेश मालविया मास्टर ट्रेनर (महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड), पवन बुरघाटे जिल्हा को-ऑर्डिनेटर (महाराष्ट्र नॉलेज कॉपोरशन लिमिटेड) या तज्ज्ञांनी विविध उपयुक्त विषयांवर मार्गदर्शन केले. यात प्रशासनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचावापर करून सेवांची गुणवत्ता, गती, पारदर्शकता आणि लोकाभिमुखता कशी वाढवता येते, याबद्दल प्रत्यक्ष उदाहरणांसह चर्चा करण्यात आली.या प्रशिक्षणाद्वारे सहभागी अधिकाऱ्यांना व कर्मचा-यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून विविध ई-गव्हर्नन्स टूल्सचे प्रशिक्षण देण्यात आले. महानगरपालिकेच्या आगामी योजनांमध्ये यापैकी अनेक साधनांचा समावेश करून नागरिकांना अधिक चांगल्या सेवा पुरवण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे.कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्यामुळे अधिकारी व कर्मचारी दैनंदिन कामकाजातील अनेक प्रक्रिया उदा. नोंदी व्यवस्थापन, पत्रव्यवहार, अहवाल लेखन, नागरिकांच्या तक्रारींचे विश्लेषण अधिक जलद, अचूक आणि परिणामकारक पद्धतीने करू शकतील. चॅट जीपीटी सारखी साधने शासकीय मजकूर तयार करण्यात वेळ व कष्ट वाचवतात, तर डेटा विश्लेषण टूल्स धोरणनिर्मितीत मदत करतात. हे तंत्रज्ञान केवळ भविष्य नाही, तर आजच्या कामाचा एक भाग बनू लागले आहे. एआय म्हणजे संकट नव्हे, तर तो आपला स्मार्ट सहकारी आहे, जो कार्यालयीन कामकाज अधिक जलद, सुलभ आणि अचूक बनवतो.यापुढेही महानगरपालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांना अशा प्रकारचे प्रशिक्षण वेळोवेळी देण्यात येणार आहे.

प्रशिक्षणादरम्यान अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, उपायुक्त नरेंद्र वानखडे, सहाय्यक संचालक नगर रचना घनश्याम वाघाडे, शहर अभियंता ईश्वरानंद पनपालिया, मुख्यलेखापरिक्षक श्यामसुंदर देव, सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, नंदकिशोर तिखिले, दिपीका गायकवाड, धनंजय शिंदे, सुभाष जानोरे, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, कार्यकारी अभियंता रविंद्र पवार, सहाय्यक नगर रचनाकार कांचन भावे, कार्यालय अधिक्षक नंदकिशोर पवार, कार्यशाळा उपअभियंता लक्ष्मण पावडे, मनपा अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रशिक्षण यशस्वीकरण्याकरीता सिस्टीम मॅनेजर अमित डेंगरे, सॉफ्टवेअर अभियंता रोहन कुरील, प्रकल्प अभियंता पंकज मानवटकर, हार्डवेअर अभियंता चेतन रामटेके, संगणक विभागातील कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## १ ते ७ मे पारायण तथा सर्व संत विचार मंथन महाकुंभ मेळावा

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुतळा समितीचे आयोजन : प्रकाशनाना बोके यांची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८गुरुकुंज मोझरी**

विज्ञान युगात ग्रामगीता पारायणाचे महत्त्व कितीही सांगितले तरी थोडेच आहे. ग्रामगीता ही राष्ट्रभक्ती व विश्वातील मानव जातीला सुसंस्कारित बनविणारी संजीवनी असून एक साधना आहे.



ग्रामगीतेचा प्रचार व प्रसार व्हावा, याकरिता १ ते ७मेपर्यंत गौरी इन लॉन रहाटगाव चौक येथे ग्रामगीता पारायण तथा सर्व संत विचार मंथन महाकुंभमेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.

७ दिवस ४२ अध्यायाचे पूर्ण वाचन करण्यात येणार असल्याची माहिती प्रकाशनाना बोके यांनी गुरुवारी (ता.१७) स्थानिक राजापेठस्थित श्रमिक पत्रकार भवन येथे पत्रपरिषदेत दिली.

सप्ताहामध्ये गावागावातील गुरुदेव सेवा मंडळ, शहरातील सर्व शाखा श्री गुरुदेव समन्वय समिती तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारधारा समिती धर्मगुरू, साधुसंत, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, व्यावसायिक, लोकप्रतिनिधी, कामगार, शेतकरी, शेतमजूर, बचत गट, सृजन नागरिक तथा संस्था संघटनांचे पंधराशेवर प्रतिनिधी महाकुंभ मेळाव्यात सहभागी होणार असल्याचे मनोहर साबळे यांनी सांगितले.विचार मंथन महाकुंभमेळाव्यामध्ये सहभागी होणाऱ्यांसाठी निवास व विश्रांतीची व्यवस्था करण्यात आली असून दोन्ही वेळचे भोजन व नाश्ता देण्यात येणार आहे तसेच प्राथमिक आरोग्य सेवा उपलब्ध राहील. येताना स्वतःचे कपडे, भगवी टोपी, चादर, आसन, ग्रामगीता ग्रंथ, पाण्याची बॉटल सोबत घेऊन यावी.ग्रामगीता व इतर साहित्य विक्रीसाठी मेळाव्यात उपलब्ध राहणार असल्याचे पुणे येथील माजी उपमहापौर मुरलीधर ढगे यांनी सांगितले.


पत्रपरिषदेला प्रकाश नाना बोके, मनोहर साबळे, मुरलीधर ढगे, प्रकाश बोके, डॉ. जावरकर, संकेत शास्त्री, काळे महाराज, निरंजन घाटेकर, विजय बोके, महादेव सोळंके, बाबुराव धोटे, प्रदीप वानखडे, प्रा. मनोज विष्णूरकर, गणेशदादा जगताप, संकेत काळे, संजय तायवडे, केशव पांडे, नरेंद्र मोहरे उपस्थित होते.

## अमरावती-मुंबई विमानभाडे डबल, अनेकांचा हिरमोड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती**

अमरावतीवरून मुंबईसाठी हवाई वाहतुकीचा बुधवारी (ता. १६ एप्रिल) रोजी शुभारंभ झाला. मात्र अमरावती-मुंबई-अमरावतीचे तिकीट भाडे मात्र अनेकांचा हिरमोड करणारे ठरू पाहत आहे.







शुभारंभाची फ्लाईट बुधवारी उडाल्यानंतर नियमित पहिली फेरी शुक्रवारी (ता. १८) होणार आहे. अलायन्स एअरचे विमान दुपारी २.३० वाजता मुंबईवरून टेकऑफ झाल्यानंतर शंभर मिनिटांचा प्रवास करून ४.०५ मिनिटांनी अमरावती विमानतळावर पोहोचणार आहे. अवघ्या २५ मिनिटांत म्हणजेच ४.३५ वाजता ही फ्लाईट मुंबईसाठी उड्डाण भरणार आहे.

अमरावती-मुंबई-अमरावती यापैकी एकेरी प्रवासाचे किमान भाडे २१०० रुपये व सर्व कर आकारून व अखेरच्या क्षणापर्यंत ते कमाल चार हजार रुपयांपर्यंत राहिल, अशी माहिती महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पाण्डेय यांनी पत्रपरिषदेत दिली होती. मात्र तसे काहीही नाही.अनेक इच्छूक मेक माय ट्रीप अथवा अलायन्स एअर डॉट को, या संकेतस्थळावर तिकीटाच्या बुकींगबाबत भेटी देत आहेत. अलायन्स एअर डॉट को या संकेतस्थळावर अमरावती-मुंबई फ्लाईट नजिकच्या काही दिवसात फ्लाईट उपलब्धच नसल्याचे दिसत आहे तर मेक माय ट्रीप या संकेतस्थस्थळाव २३ एप्रिल रोजीचे एकीकडील भाडे ६८१० रुपये दर्शविले जात आहे.

एकीकडे ५६०० रुपये कमितकमी भाडे दर्शविले जात आहे. सुपरफास्ट रेल्वेपेक्षा विमानभाडे स्वस्त असेल, ही अमरावतीकरांची अपेक्षा तूर्त फोल ठरली आहे.

## जुनी पेंशन योजनेच्या प्रस्तावाची पडताळणी २१ एप्रिल रोजी

### विभागातील शिक्षक, कर्मचाऱ्यांनी उपसंचालक कार्यालयात उपस्थित राहण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती–** जुन्या पेंशन योजनेच्या प्रस्ताव पडताळणीसंदर्भात अमरावती विभागातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी मुख्याध्यापकां सह अमरावती विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय येथे २१ एप्रिल रोजी उपस्थित राहण्याचे आवाहन प्रहार शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी केले आहे. उच्च न्यायालयाच्या दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या आदेशानुसार अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशीम व बुलडाणा येथे माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात सादर केलेल्या जुन्या पेंशन योजनेच्या प्रस्ताव




पडताळणी संदर्भात मते व वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी अमरावती विभागीय शिक्षण उपसंचालक निलीमा टाके (गुल्हाने) यांनी पत्र निर्गमित केले आहे. सुनावणीस विभागातील माध्यमिक मधील कार्यरत शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन प्रहार शिक्षक संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे. जुन्या पेंशन योजनेच्या प्रस्ताव पडताळणीच्या वेळी अमरावती अकोला, यवतमाळ, वाशीम व बुलडाणा या पाचही जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी व वेतन पथक अधिक्षक उपस्थित राहणार आहेत.

## अक्षय तृतीयेला बालविवाह केल्यास होणार कठोर कारवाई

### जिल्हा प्रशासनाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती** – अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर होणारे बालविवाह रोखण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी बालविवाह करणाऱ्यांवर कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. बालविवाह करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, तसेच बालवधूचे स्वागत करणाऱ्यांना तुरुंगात पाठवण्यात येईल, असेही ते म्हणाले.मागील सहा वर्षात प्रशासनाने ३ हजार ९५४ बालविवाह रोखले आहेत. गेल्या वर्षभरात महिला व बालविकास विभागाने १८ बालविवाह थांबवले आहेत. यासाठी बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ मधील कलम १६ (१) नुसार ग्रामीण भागासाठी ग्रामसेवक आणि शहरी भागासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांची बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर जिल्ह्यात बालविवाह



होणार नाहीत, यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत. बालविवाह रोखण्यासाठी गावांमध्ये जनजागृती कार्यक्रम, बैठका, रॅली आणि माहितीपत्रके वाटप करण्यात येत आहे. बालविवाहात सहभागी होणारे धार्मिक गुरु, पंडित, सेवा देणारे, मंडप मालक, फोटोग्राफर, केटरिंग व्यावसायिक, लॉन्स मालक आणि वाजंत्री यांच्यावरही कायदेशीर येईल. कारवाई करण्यातअमरावती जिल्हा ३ जानेवारी २०२३ पासून बालविवाह मुक्त घोषित करण्यात आला आहे. नागरिकांनी बालविवाह रोखण्यासाठी टोल फ्री क्रमांक १०९८ किंवा ११२ यावर माहिती द्यावी, नागरिकांनी सतर्क राहून बालविवाह रोखण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.–




# न्यायाधीशांच्या घरातील ५.२४ लाखांचे दागिने चोरी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती–** बदली झाल्यानंतर न्यायाधीशांच्या घरातील सामान शिप्टींग करित असताना काळ्या बॅगसह ५ लाख २४ हजार ५०० रुपयांचे सोन्याचे दागिने चोरी झाल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी पोलिसांनी राजश्री रविंद्र गडगदल्ली (वय ३७रा. ब्रम्हपुत्री अपार्टमेंट, कांतानगर) यांच्या तक्रारीवरून अनोळखी चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल केला.

न्यायाधीश गडगदल्ली यांची सिंधुदुर्ग येथे बदली झाली. त्यामुळे त्यांनी १६ एप्रिल रोजी जैनचा ट्रक सामान भरण्याकरिता सांगितला होता. तेव्हा ट्रकसह जैनचे ७ ते १० व्यक्ती घरातील सामान भरण्याकरिता आले होते. अपार्टमेंटसमोर ट्रक उभा करून ते घरातील सामान ट्रकमध्ये भरत होते.

दरम्यान न्यायाधीश यांच्या पत्नी राजश्री यांनी सोन्याचे



दागिने यामध्ये एक तोळ्याचा राणी हार, दिड ते दोन तोळ्याचे मोठे मंगळसुत्र, एक तोळ्याचा दुसरा राणी हार, लहान मुलांच्या एक-एक तोळ्याच्या चार सोन्याच्या चेन, ७ ग्रॅमच्या दोन सोन्याच्या अंगठ्या, ४ ग्रॅमचे कानातले, २ ग्रॅमचे कानातले, तीन तोळे चांदीचे दागिने, कानातील वेल सोन्याचा ४ ग्रॅम, चांदिचे ताट, दोन दिवे, हळदी कुंकवाच्या दोन वाट्या, चांदिचे दोन ग्लास असा एकूण ५ लाख २४ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल काळ्या पर्समध्ये ठेवला आणि पर्स पतीकडे दिली. त्यांनी ती पर्स स्वतःच्या कार क्र. एम.एच. ०९ एफ.बी. २१५० च्वा ड्रायव्हर सीटखाली ठेवली, त्यावेळी ट्रकमध्ये संबंधित व्यक्ती सामान भरत होते. त्यानंतर ते कार घेऊन बियाणी चौकातील एटीएममध्ये पैसे काढण्याकरिता गेले. परत आल्यावर त्यांनी कार पार्कीगमध्ये उभी केली आणि सर्वांनी जेवण केले. त्यानंत एक ते दिड तासानंतर ते सिंधुदुर्गला जाण्याकरिता निघाले. तेव्हा राजश्री यांनी पतीला काळी पर्स मागितली मात्र पर्ससह सोन्याचे दागिने चोरी झालेले दिसताच त्यांनी गाडगेनगर ठाण्यात धाव घेतली. या घटन पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करून चोरट्यांचा शोध सुरु केला.

# भानखेड्यात विवाहबाह्य संबंधातून महिलेच्या डोक्यावर कुऱ्हाडीने वार

## पती गंभीर जखमी, भानखेडा येथील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती–** विवाहबाह्य संबंधातून शेजाऱ्याने महिलेच्या डोक्यावर कुऱ्हाडीने घाव घातला तर तिच्या पतीच्या हातावर चाकूने वार करून दोघांना गंभीर जखमी केले. ही धक्कादायक घटना १६ एप्रिल रोजी नजिकच्या भानखेडा गावात घडली.

याप्रकरणी पोलिसांनी महिलेच्या पतीच्या तक्रारीवरून रमेश पंजाब शिंदे (वय ४०), साजन रमेश शिंदे (वय २२), राज रमेश शिंदे (वय १८) आणि एक महिला (सर्व रा. भानखेडा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

रमेश शिंदे याचे जखमीच्या महिला नातेवाईकासोबत विवाहबाह्य संबंध आहे. या कारणावरून त्यांच्यात नेहमी भांडण होत होते. दरम्यान १२ जुन २०२४ रोजी महिलेच्या मुलाने रमेश शिंदे याची समजुत काढण्याचा प्रयत्न केला होता. तेव्हा रमेशने त्याच्या हातावर लाकडी दांडा मारून त्याचा हातच निकामी केला. तसेच ५ जूलै २०२४ रोजी महिलेच्या पतीला जबर मारहाण केली होती. त्यामुळे दोन्ही परिवारात चांगलेच भांडण झाले होते. दरम्यान १६ एप्रिल रोजी

रमेशचे महिलेच्या पतीसोबत भांडण झाले. तेव्हा रमेश व त्याच्या घरातील सदस्यांनी महिलेच्या डोक्यावर कुऱ्हाड मारून गंभीर जखमी केले. दरम्यान पती मध्यस्तीकरीता आला असता त्यांच्या हातावर चाकूने वार केला. घटनेनंतर गावातील लोकांनी बडनेरा पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी जखमींना रुग्णालयात दाखल केले आणि जखमी पतीच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला.

# केसगळतीपाठोपाठ आता नखगळती आजाराचे संकट !

## शेगाव तालुक्यात तब्बल ३७ रुग्ण आढळले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८बुलढाणा–** चालू वर्षांच्या प्रारंभापासून केस गळती आणि टक्कल पडण्याच्या आजाराने शेगाव तालुक्यातील रहिवश्यांना भयभीत केले. याचा प्रसार शेजारील खामगाव आणि नांदुरा तालुक्यातही झाला. आता त्या पाठोपाठ नख गळून पडण्याचा आजार समोर आला आहे. गुरुवार १७ एप्रिल रोजी करण्यात आलेल्या आरोग्य विभागाच्या पाहणीत नख गळतीचे ३७ रुग्ण आढळून आले आहे. यामुळे शेगाव तालुक्यासाह जिल्ह्यात तसेच आरोग्य यंत्रणात एकच खळबळ उडाली आहे. त्यामुळे तालुक्यातील हजारो नागरिक भयभीत झाले आहे.

जानेवारी २०२५ मध्ये केस गळती आणि टक्कल पडण्याच्या या विचित्र आजाराचे रुग्ण आढळून यायला सुरुवात झाली. ही संख्या तीनशेच्या घरात गेली आहे. अजूनही याचे

### सेलिनियमचा परिणाम ?

केसांप्रमाणेच हा सेलिनियमचा परिणाम असल्याचे जाणकारांनी सांगितले. बाधित गावातील गावकऱ्यांच्या शरीरात सेलिनियमचे प्रमाण कैकपटीने वाढल्याने केसांप्रमाणेच नख गळत असल्याचा दावा या सूत्रांनी बोलून दाखविला. ज्येष्ठ संशोधक पद्मश्री डॉ. हिंमतराव बावस्कर यांनी केलेल्या तपासणीतं गावकऱ्यांच्या शरीरात याचे गंभीर प्रमाण आढळले होते.

ठोस निदान झाले नसून हमखास उपचार निघाला नाही. केस गळती आणि टक्कल पडण्याचे आव्हान कायम असतांनाच आता नवीन सकट समोर आले आहे. केस गळतीच्या आजाराचा केंद्रबिंदू असलेल्या शेगाव तालुक्यातील चार



गावात नवीन आजाराने तोंड वर काढले आहे. या गावातील गावकऱ्यांच्या हाताची नखे कमकुवत होऊन गळून पडत आहे. बोंडगाव, कालवड, काठोरा आणि मच्छिन्द्रखेड गावामध्ये केस गळती नंतर आता नागरिकांचे बोटांची नखेही गळून जात असल्याने गावकऱ्यांची स्थिती बिकट झाली आहे.यासंदर्भात विचारणा केली असता आरोग्य विभागाच्या वरिष्ठ सूत्रांनी या घडामोडीला अप्रत्यक्ष दुजोरा दिला. बोंडगावसह परिसरात अचानक नखे गळत असल्याचे त्यांनी सांगितले. बोंडगावमध्ये जिल्हा परिषदेच्या जिल्हा आरोग्य विभागाचे एक पथक गरूवारी दाखल झाले. पथकातील अधिकाऱ्यांनी प्रथम शेगाव तालुका आरोग्य कार्यालयाला भेट देऊन प्राथमिक चौकशी केली. नखगळती संदर्भात प्राप्त तक्रारी, प्राथमिक माहिती जाणून घेतली. यानंतर हे पथक बोंडगावमध्ये दाखल झाले. वरील चार गावात मिळून ३७रुग्ण आढळल्याचे सूत्रांनी सांगितले.

# २१ एप्रिलला प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती**अमरावती शासकीय औद्यागिक प्रशिक्षण संस्थेतील एनएसएस हॉलमध्ये २१ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० वाजता प्रधानमंत्री राष्ट्रीय शिकाऊ उमेदवारी भरती मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या भरती मेळाव्यामध्ये पूणे तसेच अमरावती जिल्ह्यातील स्थानिक नामांकित कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. मेळाव्यात नोकरी इच्छुकांनी या भरती मेळाव्यात




फिटर वायरमन टर्नर, मशिनिस्ट, वेल्डर, इलेक्ट्रिशियन, कारपेन्टर, इलेक्ट्रॉनिक्स, सुइंग टेक्नॉलाजी, ड्रेस मेकिंग, फॅशन टेक्नॉलाजी, कोपा, ट्रॅक्टर मेकॅनिक, डिझेल मेकॅनिक, आणि मोटर मेकॅनिक, आयटीआय तसेच १० वी, १२ वी उत्तीर्ण उमेदवार, प्रशिक्षणार्थीनी यांनी बायोडाटा व मूळ कागदपत्राच्या छायांकीत प्रतीसह सहभागी व्हावे. या सुवर्ण संधीचा लाभघ्यावा, असे आवाहन उपसंचालक तसेच सहायक प्रशिक्षणार्थी सल्लागार औद्यागिक प्रशिक्षण संस्था, अमरावती यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे

# दोन दिवस राहणार अमरावती, बडनेरा शहराचा पाणीपुरवठा बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**



**दि.१८अमरावती–** पाईप लाईनमधून होत असलेल्या पाणी गळतीचा दोष दुरूस्तीच्या अनुषंगाने अमरावती व बडनेरा शहराचा पाणीपुरवठा २३ व २४ एप्रिलला पूर्णतः बंद राहणार आहे.अमरावती पाणीपुरवठा योजनेच्या निरपिंगळाई बीपीटीपासून येणारी २५ मीमी व्यासाच्या पीएससी गुरूत्ववाहिनीमधून नांदगाव ते माहुली गावाच्या मध्ये पाणीगळती होत आहे. हा दोष दुरूस्त करण्याकरिता २२ ते २३ एप्रिल रोजी अमरावती व बडनेरा हरातचा पाणीपुरवठा बंद राहणारआहे. पाणीगळती दोष त्वरित दुरूस्त करण्यात येऊन पाणी पुरवठा पूर्ववत सुरू करण्यात येणार आहे. तरीपण नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करून साठवून ठेवावे, असे आवाहन मजीप्राच्या अधिकाऱ्यांनी केले आहे.–

# ऑटोचालकांचा बसस्थानक परिसरात चक्काजाम

## महापालिकेच्या शहर बसला मध्यवर्ती बसस्थानकात थांबा दिल्याचा रोष, आरटीओ कार्यालयावरही निदर्शने



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अमरावती :** महानगरपालिकेच्या शहर बसला मध्यवर्ती बसस्थानकाच्या आत थांबा दिल्यामुळे संतप्त ऑटोचालकांनी मध्यवर्ती बसस्थानक परिसरातच चक्काजाम आंदोलन करून रोष व्यक्त केला.प्रवाशांना सोयीचे व्हावे, याकरिता महापालिकेच्या शहर बसला मध्यवती बसस्थानक परिसरात थांबा देण्याचा निर्णय राज्य परिवहन महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी बैठकीत घेतला. त्यामुळे बसस्थानकाबाहेर ऑटो थांब्यावर तासंतास प्रवाशांची वाट बघत उभे राहणाऱ्या ऑटोचालकांचा या निर्णयामुळे व्यवसाय बुडेल याची भिती बाळगत शहर बसकरिता आतील थांबा रद्द करावा. या मागणीकरिता ऑटो चालकांनी गुरुवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास बसस्थानकाच्या आतशिरून एसटी बसेस अडवून धरण्याचा प्रयत्न केला. चक्काजाम आंदोलनामुळे येथून सुटणाऱ्या एसटी बसेस बाहेर पडू शकल्या नाहीत. त्यामुळे प्रवाशांना त्याचा फटका बसला. अखेर राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी पोलिसांना त्याबाबत माहिती दिली.

पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलिस आयुक्त जयदत्त भंवर, वाहतूक पोलिस निरीक्षक रीता उईके आदींनी बसस्थानक परिसरात चक्काजाम करणाऱ्या ऑटोचालकांसोबत चर्चा करून त्यांची समजूत काढली. परंतु आंदोलनामुळे तासभरासाठी आत असलेल्या प्रवाशांचा खोळंबा झाला. एसटी अधिकाऱ्यांनीही ऑटोचालकांसोबत चर्चा केली. समाधान झाल्यानंतर चक्काजाम आंदोलन ऑटोचालकांनी मागे घेतले.

# अचलपूर महसूल विभागाला कर संकलनातून मिळाले पाच कोटी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८अचलपूर :–** तालुक्यातील महसूल विभागाला जमीन महसूल, संकीर्ण महसूल व गौण खनिज कर वसुलीतून ५ कोटी ६० लाख ३७ हजार ६७८ रुपयांचा महसूल प्राप्त झाला असल्याची माहिती तहसील कार्यालयामधून प्राप्त झाली आहे.

जमीन महसूलीतून १ कोटी ५५ लाख ३ हजार ३१०, संकीर्ण वसुलीतून १ कोटी ५६ लाख १७ हजार ८६ रुपये तर गौण खनिजमधून शासनाला २ कोटी ४७लक्ष ८२ हजार ४८२ रुपयाचा महसूल प्राप्त झाला. अचलपूर तहसील कार्यालयाने खनिज संपत्तीतून मिळणारी रक्कम जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर झालेली वसुली तसेच करमणूक करामधून वसुली केली. करमणूक करापोटी अचलपूर तालुक्याला १ लाख ३४ हजार ८०० रुपयांचा महसूल प्राप्त झाला. गौण खनिज संपत्ती मधून मिळणारी रक्कम जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर झालेली गौण



खनिजाची वसुली रक्कम तसेच करमणूक करावरील थकीत उपकर रक्कम असे मिळून अचलपूरला २ कोटी ४९ लाख १७ हजार २८२ रुपयाचा महसूल प्राप्त झाला. जमीन महसूल, वाढीव सारा, जिल्हा परिषद कर, ग्राम पंचायत उपकर, शिक्षण, पिके, रोजगार हमी योजना, अकृषक कर, नझुल कर, नगरपरिषद आदी विविध करातून शासनाला ३ कोटी ११ लाख २० हजार ३९६ रुपयाचा महसूल प्राप्त झाला. अनाधिकृत अकृषक, आस्थापना शुल्क, कुळ कायद्यानुसार सत्ता प्रकार करणे, नझुल भाडेपट्टा, नूतनीकरण रेकॉर्ड फी यामधूनसुद्धा महसूल प्राप्त झाला. अचलपूर महसूल विभागाला फटाका परवाना फी व इतर वसुली म्हणून ७ लाख ६५ हजार २३ रुपये प्राप्त झाले. असे सर्व करातून अचलपूर तालुक्यातील महसूल प्रशासनाला एकूण ५ कोटी ६० लाख ३७हजार ६७८ रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे. कर वसुलीमध्ये उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांच्या मार्गदर्शनामध्ये तहसीलदार डॉ. संजय गरकल, निवासी नायब तहसीलदार जगदीश मंडपे, नायब तहसीलदार महसूल अक्षय मंडवे, सहाय्यक महसूल अधिकारी गजानन खडसे, मंडळ अधीकारी अमोल बोकडे, ग्राम महसूल अधिकारी निशांत शास्त्रकार तसेच सर्व मंडळ अधिकारी व सर्व ग्राम महसूल अधिकारी यांनी परिश्रम घेतले.

# २०ला श्रीक्षेत्र जहागीरपूर येथे निःशुल्क हृदयरोग निदान शिबिर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८कुऱ्हा–**श्री महारूद्र मारूती संस्थान श्रीक्षेत्र जहागीरपूर व श्री संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य हृदयरोग निदान शिबिर रविवार २० एप्रिल २०२५ ला सकाळी ९ वाजतापासून तर दुपारी २ वाजेपर्यत श्रीक्षेत्र जहागीरपूर येथील भक्त निवासमध्ये आयोजित करण्यात आले आहे.



या शिबिरात अनुभवी तज्ज्ञ डॉक्टर्सकडून आधुनिक मशीनद्वारे हृदयाची तपासणी करण्यात येईल. शिबिरात उपलब्ध सेवा ई. सी. जी. तपासणी, रक्तगट व शुगर तपासणी, हृदयरोग सल्ला आवश्यक करण्यात येईल. उपचारासाठी मार्गदर्शनतरी भाविकांनी आपल्या गावातील व परिसरातील गरजू रुग्णांना या शिबिरामध्ये आणून शिबिराचा अवश्य लाभघ्यावा, तसेच महाप्रसादाची व्यवस्था अक्षयपात्र महाप्रसादालयात करण्यात आलेली आहे. संस्थानचे व्यवस्थापक सुनील भोंगाडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन श्री महारूद्र मारूती संस्थान श्रीक्षेत्र जहागीरपूर विश्वस्त यांनी केले आहे.

# आसरा, ऋणमोचन, नांदेडचे ग्रामस्थ मजीप्रावर धडकले

## पाणीपुरवठा सुरळीत करण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेतृत्व

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१८भातकुली–** पाणी पुरवठा सुरळीत करण्याच्या मागणीसाठी भातकुली तालुक्यातील आसरा, ऋणमोचन, नांदेडचे ग्रामस्थ गुरुवारी मजिप्रावर धडकले होते. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या नेतृत्व निवेदन सादर करण्यात आले.

भातकुली तालुक्यातील आसरा, ऋणमोचन, नांदेड या गावातील पाच ते सहा दिवसाआड पाणी पुरवठा होत आहे. त्यामुळे या गावातील नागरीकांना पाण्याकरिता

भटकंती करावी लागत आहे. याचा रोष व्यक्त करीत शेकडो ग्रामस्थ स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेतृत्वात मजिप्रावर धडकले होते. अमरावती शहरात एक दिवसाआड पाणी, आणि गाव खेड्यात पाच ते सहा दिवसाआड पाणी असा भेदभाव का असा प्रश्न स्वाभिमानी



शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रविण मोहोड यांनी उपस्थित केला. पाणी पुरवठ्याचे काम संथ गतीने करणाऱ्या कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याची मागणी देखीले यावेळी रेटण्यात आली.

उन्हाळ्याचे दिवस पाहता गाववासीयांना किमान एक दिवसाआड पाणी द्या, अन्यथा स्वाभिमानी शेतकरी संघटना कार्यालयातच मुक्काम आंदोलन करेल असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अमित अढाऊ, प्रविण मोहोड, स्वप्निल कोठे यांनी दिला.

# समृद्धी महामार्गावरून मे पासून जा सुसाट; मुंबई ते नागपूर केवळ आठ तासांचा प्रवास

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**



समृद्धी महामार्गाच्या इगतपुरी ते ठाण्यातील आमने या शेवटच्या टप्प्याची कामे पूर्ण झाली असून आता या रस्त्याच्या उद्घाटनासाठी राज्य सरकारकडे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) वेळ मागितली आहे. त्यामुळे मेच्या सुरुवातीला हा मार्ग खुला होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागपूर ते मुंबई थेट प्रवास करता येईल.

समृद्धीचा शेवटचा टप्पा खुला झाल्यानंतर नागपूरहून निघालेल्या वाहनांना थेट मुंबईच्या वेशीवर पोहोचणे शक्य होईल. तसेच हा संपूर्ण ७०१ कि.मी.चा महामार्ग सेवेत दाखल होईल.

विधानसभा निवडणुकीपूर्वी याचा इगतपुरी ते आमने हा शेवटच्या टप्प्यातील मार्ग खुला केला जाणार होता. मात्र या टप्प्यात अभियांत्रिकीच्या दृष्टीने किचकट असलेल्या खर्डी येथील पुलाचे काम बाकी होते. तसेच समृद्धीचा शेवट होतो, त्या आमने येथून पुढे वडपेला जाण्यासाठीच्या रस्त्याचे काम अपूर्ण होते. त्यावेळी फेब्रुवारीपर्यंत हा रस्ता सुरू करण्याचे नियोजन एमएसआरडीसीने केले होते. मात्र वडपे येथे नाशिक रस्त्याला जोडण्यासाठी उभारण्यात येत असलेल्या कनेक्टरचे काम अपूर्ण असल्याने या मुदतीत हा महामार्ग सुरू होऊ शकला नव्हता.

सध्या ठाणे-वडपे रस्त्याचे काम सुरू आहे. त्यामुळे या रस्त्यावरून वाहतूक संथगतीने चालते. समृद्धी महामार्ग सुरू झाला तरी या रस्त्याचे काम पूर्ण होण्यास आणखी काही महिने लागणार आहेत. त्यामुळे मुंबई ते आमने हा प्रवास तूर्त तरी अडथळ्यांचा राहणार आहे.

या महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याच्या उद्घाटनासाठी राज्य सरकारकडेवेळ मागण्यात आली आहे, अशी माहिती एमएसआरडीसीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

सद्य:स्थितीत वडपे येथे नाशिक हायवेला जोडण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या कनेक्टरच्या एका पुलाचे काम अपूर्ण आहे. ते पूर्ण होण्यास दोन महिने लागतील. तोपर्यंत या भागात वाहतूक अन्य मार्गांनी वळण घेऊन वळविली जाणार आहे, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.समृद्धीचा नागपूर ते शिर्डी हा ५२० कि.मी.चा पहिला टप्पा डिसेंबर २०२२ मध्ये खुला केला होता.

दुसऱ्या टप्प्यात शिर्डी ते भरवीर असा जवळपास ८० किलोमीटरचा मार्ग वाहतुकीसाठी सुरू करण्यात आला होता.तर गेल्या वर्षी तिसऱ्या टप्प्यात एमएसआरडीसीने भरवीर ते इगतपुरी हा आणखी २३ कि.मी.चा मार्ग सुरू केला होता. आता शेवटच्या टप्प्यात ७६ कि.मी.चा इगतपुरी ते आमने हा रस्ता वाहतुकीसाठी खुला केला जाणार आहे.

# जास्तीचे पैसे मोजूनही एसी बंद शिवशाही बसचे करायचे काय?

## एसटी महामंडळाच्या शिवशाही काही वर्षांतच झाल्या खिळखिळ्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**




खासगी वाहतुकीला टक्कर देण्यासाठी एसटी महामंडळच्या ताफ्यात शिवशाही बसेस आणल्या आहेत. परंतु सुरुवातीपासून शिवशाही बसमधील सुरक्षितेबाबत प्रश्नचिन्ह लागले आहे. अशातच आता ऐन उन्हाळ्यात जादा पैसे मोजूनही बहुतांश शिवशाहीतील वातानुकूलित यंत्रणा बंद राहत आहेत. त्यामुळे प्रवासी घामाघूम होत आहेत. खासगी बसेसमध्ये वातानुकूलित यंत्रणा, स्वच्छता यासह इतर सोयी सुविधा मिळतात. त्यामुळे लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी प्रवाशांचा त्याकडे अधिक ओढा असतो. त्यामुळे प्रवाशांना आकर्षित करण्यासाठी महामंडळाने आपल्या ताफ्यात शिवशाही बसेस दाखल केल्या. साधारण बसेसपेक्षा या शिवशाहीचे भाडे अधिक असले तरी प्रवाशांकडून त्याला पसंती दिली जात आहे. या बसेसमध्ये गैरसोय वाढली आहे.

तापमान सध्या ४१ अंशांवर गेले आहे. त्यामुळे जादा पैसे मोजण्याची तयारी दर्शवित प्रवासी वातानुकूलित असलेल्या शिवशाहीची प्रवासासाठी निवड करतात. परंतु प्रवासात अनेकवेळा बसमधील वातानुकूलित यंत्रणा बंद पडत आहे. शिवशाही बसेसचे मागील काही वर्षांत अनेक अपघात झाले आहेत. त्यामुळे वाढत्या अपघातांमुळे शिवशाही बस प्रवाशांच्या पसंती कमी होत आहे.

जिल्ह्यात अमरावती आगारात १३, बडनेरा ११, परतवाडा ५, वरूड ५ आणि दर्यापूर ५ अशा एकूण ३९ शिवशाही बसेस आहेत.

# बहुजनांचे भगीरथ डॉ.भाऊसाहेब हेच खरे महात्मा फुले यांचे वारसदार : डॉ. पंजाब पुंडकर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ दर्यापूर**



स्थानिक श्री.शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित,जे.डी.पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर. येथे डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या साठाव्या पुण्यतिथी तसेच महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंती निमित्ताने 'महात्मा फुले यांचे खरे वारसदार डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून डॉ. पंजाब पुंडकर यांनी विचार मांडताना महात्मा फुले यांचे खरे वारसदार डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख हे आहेत कारण त्यांच्या विचारांचा कार्याचा वारसा त्यांनी चालवला सामाजिक आणि शैक्षणिक कृषी, शिक्षण तसेच सामाजिक परिवर्तन यांच्या अनुषंगाने केलेले कार्य महत्त्वाचे होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मा.मा.ब. उपाख्य अण्णासाहेब रेचे आजीवन सदस्य तसेच

विशेष निमंत्रित सदस्य महाविद्यालय विकास समिती हे होते ,तर प्रमुख उपस्थितीत आजीवन सदस्य शिवाजीराव देशमुख, सदस्य कनिष्ठ महाविद्यालय व शाळा समिती, मा.भागवतराव बुरघाटे, प्रा.पंजाबराव म्हाला, मा.दामोदराव होले प्राचार्य डॉ. अतुल बोडखे,आयक्यूएसी समन्वयक डॉ. मनीष होले, कार्यक्रम समिती समन्वयक डॉ. मिलिंद भिलपवार हे प्रामुख्याने उपस्थित होते

आपल्या अध्यक्षीय भाषणात मा.अण्णासाहेब रेचे यांनी या महाविद्यालयाची जडणघडण भाऊसाहेबांच्या विचाराला अनुसरून महाविद्यालय उत्तरोत्तर प्रगती करत आहे याबद्दल समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागतपर मनोगतात प्राचार्य डॉ. अतुल बोडखे यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतांना विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेऊन विविध अभ्यासक्रम महाविद्यालयात सुरु झाल्याचे सांगितले. पाहुण्यांचा परिचय डॉ.मिलिंद भिलपवार यांनी करून दिला. याप्रसंगी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ भावपूर्ण श्रद्धांजलीपर गीत डॉ. सुरेंद्र शेजे संगीत विभागप्रमुख यांनी सादर केले. सूत्रसंचालन डॉ. विनोद कोकणे तर आभार डॉ. संजय आगलावे यांनी मानले.यावेळी शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्रात होणार अनोखी आयडॉल बँक : या बँकेत पैसे नव्हे तर..

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती २९**



या आठवड्यात चक्क धावत्या रेल्वेत बँकेचे एटीएम मशीन सुरु झाल्याचे वृत्त आपण वाचले. आता तर महाराष्ट्रात आणखी एक बँक तयार होणार आहे. हि बँक महाराष्ट्र सरकार स्वतः उभारणार असून या बँकेत पैसेचे नव्हे तर चक्क आदर्श गुणांचे क्रेडीट व डेबिट होणार आहे. विशेष म्हणजे आयुक्त, जिल्हाधिकारी सारखे भाप्रसे अधिकारी या बँकेचे ऑडीट प्रमुख म्हणून काम करणार आहे. चला तर हि बँक कोठे असणार व बँकेचे क्रेडीट व डेबिट कसे होणार ते जाणून घेऊया.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दिनांक १६ एप्रिल २०२५ रोजी आयडॉल शिक्षक व शैक्षणिक संस्था, शाळा बँक नावाने एक नवीन शासन निर्णय निर्गमित केला आहे. यामध्ये शाळा व वर्ग स्तरावर आदर्श व गुणवत्तापूर्ण कामगिरी करणाऱ्या शाळा व आदर्श काम करणाऱ्या शिक्षकांच्या कार्याची दखल घेतली जाणार आहे. विशेष म्हणजे आयडॉल शिक्षक व शाळांची निवड करण्यासाठी तालुका ते राज्यस्तरावर समिती स्थापन केली जाणार आहे. तालुकास्तरीय समिती प्रमुख गटशिक्षणाधिकारी, जिल्हास्तरीय समिती प्रमुख जिल्हाधिकारी तर राज्यस्तरीय समिती प्रमुख म्हणून शिक्षण आयुक्त हे राहणार आहे.

**बँकेत भांडवल काय ?**

या आयडॉल बँकेत भांडवल स्वरुपात नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, स्कॉफ, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा, स्पर्धा परीक्षा, समाज सहभाग, अध्ययन निष्पत्ती, शिक्षकांचे शारीरिक व मानसिक आरोग्य, अतिरिक्त पूरक वाचन, स्वच्छता, परसबाग, वृक्षसंवर्धन, संगणकीकरण, शाळा व्यवस्थापन समिती, प्रशिक्षण शासकीय योजनांचा प्रचार व प्रसार, विद्यार्थी उपस्थिती, पालक जनजागृती आदींवर भर राहणार आहे. आयडॉल शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीच्या उच्चतम कामगिरीच्या ठेवीवर सर्वाधिक ६० टक्के व्याज मिळणार आहे. तर शाळांना मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा व स्कॉफ या ठेवीवर सर्वाधिक २० टक्के व्याज परतावा मिळणार आहे.

**आयएसएस करणार सोशल ऑडीट**

राज्यस्तरावर शाळा व शिक्षकांचे मूल्यमापन करण्यासाठी राज्यस्तरीय समिती स्थापन केली जाणार आहे.यात आयुक्त (शिक्षण) हे समिती प्रमुख तर शिक्षण संचालक (राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,पुणे) हे उप प्रमुख, संचालक प्राथमिक / माध्यमिक शिक्षण तज्ञ, उपसंचालक (एससीइआरटी) व सचिव म्हणून सहसंचालक (एससीइआरटी) समिती मध्ये सहभागी असणार आहे. जिल्हा स्तरीय समिती मध्ये सुद्धा दोन भाप्रसे अधिकारी या समितीत असून जिल्हाधिकारी हे समिती प्रमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी उपप्रमुख, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था प्राचार्य, शिक्षणाधिकारी, शिक्षण तज्ञ व जेष्ठ अधिव्याखाता हे सचिव म्हणून काम बघणार आहे. तालुका स्तरीय समिती मध्ये गटशिक्षणाधिकारी हे प्रमुख तर, अधिव्याखाता, शिक्षण तज्ञ, केंद्र प्रमुख तर सचिव म्हणून विस्तार अधिकारी हे समितीत सहभागी असणार आहे.(बाहेरील चर्चेनुसार समिती प्रमुख म्हणून तहसीलदार किंवा गटविकास अधिकारी हे समिती प्रमुख म्हणून बदल संभवू शकतो) ह्या समिती मार्फत शाळा व शिक्षकांच्या गुणवत्तापूर्ण कामाचे ऑडीट केल्या जाणार असून वरील विषयानुरूप त्यांचे खातेवर गुणांचे क्रेडीट किंवा डेबिट केल्या जाईल.

**ऑडीट नंतर बक्षीस काय ?**

विविध स्तरावर आयडॉल शिक्षक तथा शाळांचे मूल्यमापन झाल्यावर या आयडॉल शिक्षकांच्या सक्सेस स्टोरी ह्या शब्द व चित्रीकरणाच्या माध्यमातून जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डाएट) तथा राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद यांच्या संकेतस्थळ तथा विविध कार्यक्रमातून (उदा.शिक्षण परिषद,प्रशिक्षण) शब्द, चित्र, तथा विविध माध्यमाद्वारा प्रकाशित व प्रसारित केले जाणार आहे.

# लिंबू पाच रु.ला एक तर पालेभाज्याही महागल्या शेतकऱ्यांना कमी, तर व्यापाऱ्यांनाच होतो फायदा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**



मागील काही दिवसांमध्ये तापमानासोबतच भाजीपाल्याच्या दरातही वाढ होत आहे. गवार, शेवग्याच्या शेंगांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. लिंबांचे दर गगनाला भिडले असून पाच रुपयांना एक मिळत आहे. दुसरीकडे या वाढत्या दराचा शेतकऱ्यांना कमी, तर व्यापाऱ्यांनाच जास्त फायदा होत आहे.

उन्हाळ्यामध्ये पाण्याची पातळी खालावते. त्यामुळे भाजीपाल्याची लागवड कमी प्रमाणात करण्यात येते. तसेच वाढत्या तापमानामुळे भाजीपाल्याचे नुकसान होते. परिणामी उत्पादनात घट येते. दुसरीकडे ग्राहकांकडून भाजीपाल्याची मागणी मात्र कायम आहे. मागणी जास्त आणि उत्पादन कमी असल्यामुळे दरात वाढ झाली आहे. गत काही वर्षांपासून भाजीपाल्याच्या उत्पादन खर्चात मोठी वाढ झाली आहे. मजुरीही प्रचंड वाढली आहे.

चांगल्या आरोग्यासाठी आहारात पालेभाज्यांचा जास्तीत जास्त समावेश करावा, असा सल्ला डॉक्टर देतात. त्यामुळे अनेक नागरिक आहारात पालेभाज्यांचा समावेश करतात. त्यामुळे पालेभाज्यांची मागणी वाढली आहे. उन्हाळ्यामध्ये सिंचनाची सोय नसल्याने अनेक शेतकरी भाजीपाल्याची लागवड करीत नाहीत. तसेच उन्हाच्या कडाक्यामुळे भाजीपाल्याच्या उत्पादनातही घट येते. मागणीच्या तुलनेमध्ये पुरवठा होत नसल्याने पालेभाज्यांचे दर वधारले आहेत.

उत्पादन खर्चात भरमसाट वाढ झाली असून, भावात मात्र त्या तुलनेत वाढ झाली नाही. तसेच अल्प भावात भाजीपाल्याची खरेदी करण्यात येत असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होते.

**लिंबांचे दर भिडले गगनाला**

उन्हाळ्यामध्ये तापमान वाढल्यानंतर नागरिक लिंबू सरबत पिण्यावर भर देतात. लिंबू सरबत आरोग्यासाठी लाभदायक असल्याचा सल्ला डॉक्टर देतात. त्यामुळे उन्हाळ्यात लिंबाची मागणी वाढते, तसेच उन्हाळ्यात लिंबांची आवक कमी असते. त्यामुळे भावात वाढ होते.शहरात सध्या पाच रुपयांना एक या दराने लिंबांची विक्री केली जात आहे.

# अल्पवयीन मुलांची लूटमार मोबाइलसह दुचाकी पळविली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**

एका मंदिराजवळ पाच महाविद्यालयीन तरुण फोटो काढण्यासाठी गेले असता, त्यावेळी त्यांची लूटमार करण्यात आल्याची घटना मंगलधाम कॉलनी भागात घडली. याप्रकरणी गुरूवार, १७एप्रिल रोजी तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

जनार्दन पेठे येथील १७वर्षीय किशोरवयीन मुलाने याप्रकरणात तक्रार दाखल केली. तो बुधवारी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास त्याच्या मित्रांसह मंगलधाम कॉलनीतील टेकडीवरील हनुमान मंदीराजवळ फोटो काढण्यासाठी गेला होता. त्याठिकाणी आधीच तिन्ही आरोपी बसले होते. त्यांनी या मुलांना शिवीगाळ केली. त्यामुळे तक्रारकर्ता व त्याचे मित्र पळतच टेकडीवरून खाली उतले; मात्र त्या तिघांनी त्यांच्या दिशेने दगडफेक केली. त्या तिघांनी तक्रारकर्त्यांसह त्याच्या मित्रांचा पाठलाग करून त्यांना मारहाणही केली. तसेच त्यांना चाकूने मारण्याचा धाक दाखवून त्यांच्याजवळचे मोबाइल हिसकले आणि त्यांची दुचाकी घेऊन तिघांनीही पळ काढला. त्या तिघांनी या मुलांकडून जवळपास २ लाख ३० हजार रुपयांचा ऐवज लूटला.

# ३५ कोटी मंजूर नगरोत्थान निधीमधून दस्तूर नगर ते छत्री तलाव ते भानखेडा कॉंक्रिटीकरण

## आमदार रवी राणा यांनी अधिकाऱ्यांसोबत पाहणी करून दिल्या उपयुक्त सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८ अमरावती**



आमदार रवी राणा यांनी शासनाकडून मंजूर करून आणलेल्या नगरोत्थान निधीमधून दस्तुरनगर ते छत्री तलाव ते भानखेडा हा कॉंक्रिटीकरण चा रस्ता तयार होणार आहे दस्तूर नगर चौकात भव्य प्रवेशद्वार बांधकाम होईल या रस्त्याचे चौकाचौकात सौंदर्यीकरण करणार डिव्हायडर बांधकाम होईल रस्ताचे रुंदीकरण होईल त्यामुळे रस्त्यावरील अडथळा ठरणारे विद्युत खांब ची शिफ्टिंग करावी लागणार व पिण्याचे पाईपलाईन नवीन विस्तारीत करावी लागणार आहे

या रस्त्यावरील संपूर्ण तिक्रमण काढावे लागणार या सर्व कामांची किंमत ३५कोटी रुपये आहे हे सर्व कामे वेळीच ठरलेल्या कालावधीत पूर्ण करावी अशा सूचना आमदार रवी राणा यांनी आज उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या यावेळी मनपाचे आयुक्त सचिन कलंत्रे अतिरिक्त आयुक्त महेश देशमुख, शहर अभियंता पवार शहराचे नगररचना अधिकारी पावडे मजीप्रा चे कार्यकारी अभियंता सोळंके, उप अभियंता लव्हेकर, शहर अभियंता वीज कंपनी, कार्यकारी अभियंता पी.डब्ल्यू चे कार्यकारी अभियंता व इतर अधिकारी उपस्थित होते यावेळी मोठ्या संख्येने युवा स्वाभिमान पार्टीचे सुनिल काळे, सचिन भेंडे, उमेश ढोणे, श्याम कथे,निलेश कचनपुरे, नितीन तायडे, शुभम जनबंधू, सिद्धार्थ बोथरा राजेश तायडे, आदी मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

# देवदर्शनाला जाणाऱ्या बसला बुलढाणा येथे भीषण अपघात

## ३५ भाविक जखमी; तिघांची प्रकृती गंभीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८बुलढाणा**



बुलढाणा जिल्ह्यात 'देव दर्शन' यात्रेसाठी निघालेल्या एका बसची पार्क केलेल्या ट्रकला धडक झाल्याने ३५ भाविक जखमी झाले आहेत. या बाबत मिळालेल्या माहितीनुसार, ही बस आंध्र प्रदेशाहून नाशिक आणि शिर्डी या पवित्र स्थळांना जात असताना ही घटना घडली. शुक्रवारी पहाटेच्या सुमारास हा अपघात झाला, त्यामुळे वाहनाचे मोठे नुकसान झाले आणि प्रवाशांमध्ये घबराट पसरली होती.

मलकापूर ग्रामीण पोलिस ठाण्याचे अधिकारी संदीप काळे यांनी सांगितले की, जखमींपैकी तिघांची प्रकृती गंभीर असून त्यांच्यावर रुग्णालयात वैद्यकीय उपचार सुरू आहेत. आपत्कालीन पथकाने घटनास्थळी धाव घेतली आणि जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केले. अपघाताचे नेमके कारण काय? या बाबत तपास सुरू आहे. मात्र, या बाबत प्राथमिक माहितीनुसार असे दिसून आले आहे की, पार्क केलेल्या ट्रकमध्ये कोणतेही इशारा देणारे संकेतक नव्हते. ज्यामुळे बस ती ट्रक दिसली नाही आणि चालकाला धडक टाळणे कठीण झाले असावे, असे पोलिसांनी सांगितले आहे.


**सिव्हिल हॉस्पिटलमध्ये १० रुग्ण दाखल – डॉ. अनंता मगर**

या संदर्भात वृत्त संस्थेशी बोलताना बुलढाणा येथील सिव्हिल हॉस्पिटलचे जनरल सर्जन डॉ. अनंता मगर म्हणाले की, बुलढाणा सिव्हिल हॉस्पिटलमध्ये १० रुग्ण दाखल झाले आहेत. आंध्र प्रदेशातील भाविक देव दर्शनासाठी नाशिक आणि शिर्डी येथे जात असताना, त्यांच्या बसला अपघात झाला यात ३५ जण जखमी झाले आहेत. काही रुग्णांवर मलकापूर येथेच प्राथमिक उपचार करण्यात आले आहे. तर त्यातील गंभीर जखमी झालेल्या भाविकांना बुलढाणा जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर येथे उपचार सुरु असल्याची माहिती देखील डॉ. मगर यांनी दिली आहे. अशा दहा रुग्णांवर बुलढाणा येथे उपचार सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

# मेळघाट मधील राणीगावात भीषण पाणी टंचाई, लग्न समारंभ रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८धारणी**

धारणी तालुक्यातील एकमेव गिरीस्थानी असलेल्या राणीगावात यावेळी भीषण पाणी टंचाई असून हातपंप्पासह सर्वच योजना बंद पडून लग्नसमारंभ रद्द करण्याची वेळ आदिवासींवर आली आहे. गेल्या १५ वर्षात १५ कोटी रूपये खर्च करण्यात आल्याची गंभीर माहिती आहे. पाणीपुरवठाच्या नळातून १५ लिटर पाणी मिळत नसल्याचे भयानक चित्र सध्या या परिसरात आहे.



धारणीपासून दक्षिणेस उंच डोंगरावर वसलेल्या राणीगावात आदिवासींना जवळच्या कंजोरी गावातून बाईक, सायकल किंवा बैलगाडीवर पाणी आणावे लागत आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजना, जलजीवन मिशन, हॅण्ड पंप, आदिवासी आश्रम शाळेचे बोअर आणि शासकीय विहिरीवर तब्बल १५ कोटी रूपये १५ वर्षात खर्च केल्याचा विक्रम राणीगावच्या नावावर असूनही ग्रामस्थाना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. गावात एकच विहिर असून पाणी तळाला गेले आहे. सहा तासानंतूर पाणी जमा झाल्यावर एकाचवेळी पन्नास लोक पाणीची बकेट टाकतात. कोणालाच पुरेसे पाणी मिळत नाही. विहीरीत बाटल्यांचा एकमेकांना टकराऊन भांडण करतात तर इकडे पाण्यासाठी महिला व किशोर भांडण करत असतात.

शासकीय स्तरावरील सर्व योजना बंद पडून दरसाल पाणी टंचाई होत असते यावर्षी एप्रिल लागताच म्हणजे एक महिन्या अगोदर पिण्याच्या पाण्याची टंचाई झाल्याने नागरिकांनी लग्न समारंभपुढे ढकलल्याची गंभीर माहिती आहे. तर अनेक नागरिकांनी राणी गावात मुलगी देणे बंद केलेले असल्याने सामाजिक बहीषकाराचा धोका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्या ठिकाणी माणसांना पाणी मिळणे कठीण होत आहे तेथे पाळीव प्राण्यांची तहान भागविणे अतिशय गंभीर प्रश्न होतो. शेतकऱ्यांनी आपआपली पाळीव जनावरे इतर गावांकडे स्थलातरीत केलीधारणी तालुका प्रशासनाने राणीगावाकडे लक्ष दिले नाही तर या वर्षी पाण्या अभावी आदिवासी स्थलांतर करतील अशी दाट शक्यता आहे. धारणी तालुक्यात सर्वात जास्त पाणी टंचाई राणी गावात असल्याने तातडीने उपाय-योजना करण्याची गरज आहे.

# खडकी गावात थेट अमरावती विद्यापीठ दारात

## नयना चिंचे आणि रुपेश रेंगे यांचा कुलगुरुंनी केला गावात जाऊन सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**



दुष्काळ व पाणीटंचाईवर कळंब तालुक्यातील खडकी येथील नयना चिंचे व राळेगाव तालुक्यातील झाडगाव येथील रुपेश रेंगे या युवकांनी संघटन करुन विधायक कार्यातून अफलातून मात केली. त्यांच्या या प्रयत्नामुळे गावात आता जलक्रांती झाली. याचीच दखल घेत संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.मिलिंद बारहाते यांनी थेट खडकी गावात या दोनही युवक-युवतीचा सत्कार केला. यावेळी अमरावती विद्यापीठाचे अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून नयना चिंचे व रुपेश रेंगे यांनी स्वत:ला झोकुन देत कार्य केले. यासाठी त्यांनी गावातील विद्यार्थी, युवक व नागरिकांना एकत्र केले. सर्वांमध्ये एकजूट व विश्वास निर्माण केला. आणि सर्व एकाध्येयाने झपाटल्यागत कामाला लागले. गावातील पाणी गावातच कसे राहील यासाठी प्रयत्न केले. प्रामाणिक प्रयत्नामुळे गावातील व परिसरातील दुष्काळ पळऊन लावण्यात त्यांना यश मिळाले. त्यांच्या या कार्याची दखल थेट कुलगुरु डॉ मिलींद बारहाते यांनी घेतली. त्यांनी गावात येत या दोघांचाही सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. थेट कुलगुरु गावात येऊन एखाद्या विद्यार्थ्यांचा सत्कार केल्याची ही पहिलीच घटना आहे. यावेळी कुलगुरू यांनी आपल्या भाषणातून, या दोघांचेही कार्य इतरांसाठी प्रेरणादायी आहे. स्वप्रेरणेने त्यांनी हे कार्य केलेले आहे. त्यामुळे स्वप्रेरणा अतिशय महत्वाची आहे. अभिनेते नाही तर हेच खरे आपले आदर्श आहे. त्यामुळेच त्यांचा थेट गावात येऊन विद्यापीठातर्फे सत्कार केला जात आहे. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.अविनाश असनारे, तसेच महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अजय देशमुख यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. नयना चिंचे व रुपेश रेंगे यांनी मनोगतातून आपल्या गावाकरिता पाण्यासाठी केलेल्या कार्याची माहिती दिली. कार्यक्रमाला विद्यार्थी विकास संचालक डॉ.राजीव बोरकर, विद्यापीठ प्रशासन विभागाचे उपकुलसचिव मंगेश वरखडे, कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक रमेश जाधव, प्राचार्य डॉ.पवन मांडवकर, सरपंच जयश्री घोसले, उपसरपंच सुनिता कासार आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ.निलेश कडू यांनी केले. संचालन प्रा. स्वप्नील गोरे तर आभार यवतमाळ जिल्हा समन्वयक डॉ.निलीमा दवणे यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ.वीरा मांडवकर, प्रा.प्रशांत जवादे, कार्यक्रम अधिकारी प्रा.अनिल दौलतकर, प्रा. सुधीर त्रिकांडे, प्रा. सुशील बत्तलवार, डॉ.दत्तात्रय चव्हाण, माजी सरपंच संजय मोरे, अशोक उमरतकर, प्रा.सरोज लखविदे, डॉ.कैलास नेमाडे, डॉ.वेद पत्की, डॉ.एम.पी.राखुंडे आदींसह गावकरी तसेच इंदिरा गांधी महाविद्यालय राळेगाव, कला व वाणिज्य महाविद्यालय राळेगाव, इंदिरा महाविद्यालय कळंब, भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय बाभुळगाव, नानीबाई घारपडकर महाविद्यालय बाभुळगाव, लोकमान्य टिळक महाविद्यालय वणी येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

**दोघांनाही विद्यापीठाचे निमंत्रण**

अमरावती विद्यापीठांतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी नयना चिंचे व रुपेश रेंगे या दोघांनही कुलगुरुंनी निमंत्रित केले आहे. ते येणाऱ्या काळात वेगवेगळ्या महाविद्यालयात जाऊन विद्यार्थ्यांमध्ये स्वप्रेरणा जागृत करण्याचे काम करतील, अशी अपेक्षा आहे.

# परीक्षा घ्यायच्या की, पोषण पंधरवडा साजरा करायचा?

## शिक्षक-मुख्याध्यापकांची कसरत : निरोगीपणाच्या प्रोत्साहनाचा उद्देश

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**



प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत ८ ते २८ एप्रिल या कलावधीत पोषण आहार पंधरवडा राबविण्याचे निर्देश शिक्षक व मुख्याध्यापकांना देण्यात आले. मात्र, हाच काळ शाळांमधील परीक्षांचा आहे. यामुळे शाळेत मुलांच्या परीक्षा घ्यायच्या की, पोषण पंधरवडा साजरा करायचा असा प्रश्न शिक्षक-मुख्याध्यापकांसमोर निर्माण झाला आहे.पोषण अभियान उपक्रमाचा एक भाग म्हणून भारत सरकारने पोषण पंधरवडा घोषित केला आहे. पोषणाच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करणे, आरोग्य आणि निरोगीपणाला प्रोत्साहन देणे हा प्रमुख उद्देश आहे. पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दिला जातो. विद्यार्थ्यांचे आरोग्य सुदृढ रहावे, यासाठी विविध प्रयोग केले जातात. मात्र, आजही विद्यार्थ्यांना सकस आहार मिळत नाही. आहार कसा असावा, याबाबत जनजागृती नाही. हा उपक्रम चांगला असला तरी परीक्षेच्याकालावधीमुळे शिक्षकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. शिक्षकांकडे आधीच अशैक्षणिक कामाचा ताण आहे. त्यात आणखी एक उपक्रम दिला. जिल्हा परिषद शाळांची शैक्षणिक गुणवत्ता कमी होत असल्याची ओरड होत आहे. पटसंख्याही कमी होत आहे. त्यासाठी शिक्षकांना जबाबदार धरण्यात येत आहे. मात्र, शिक्षकांना शिकवू दिले जात नाही. त्यांच्यावर शैक्षणिक कामे लादली जात असल्याने नाराजीचा सूर उमटत आहे.८ ते २५ एप्रिल या कलावधीत पोषण पंधरवडा राबविण्याचे निर्देश आहेत. पोषणाच्या महत्त्वाबद्दल जनजागृती, निरोगी जीवनशैलीसाठी संतुलित आहाराची सवय आणि मिशन पोषण धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठी उपक्रम सुचविले. यात जागरूक्ता कार्यक्रम, संवादात्मक व्याख्याने, चर्चासत्र, आरोग्य कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन आदी उपक्रम राबवायचे आहेत.

### उपक्रमात काय घ्यायचे?

पोषण साक्षरता मोहीम, शिक्षकांच्या मार्गदर्शनात विद्यार्थी पोस्टर, स्टिकर्स तयार करणार. पोषणाशी संबंधित माहितीचा प्रचार व प्रचार करणे, पोषण नायक व नायिका निवड, चित्रकला, निबंध लेखन, भाषण व प्रश्नंजूषा स्पर्धा, कुटुंबातील खाण्याच्या सवयी, पौष्टिक आहार यावर चर्चा, घरचे आरोग्य दूत संकल्पना आदी उपक्रम राबवायचे आहेत. तसे निर्देशही केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षकांना देण्यात आले आहे.

### काय म्हणतात शिक्षक

पोषण पंधरवडा उपक्रम छान आहे, चांगला आहे. मात्र कालावधी चुकीचा आहे. ८ ते २५ एप्रिल या कालावधीत पॅट आणि शाळेचे वार्षिक मूल्यमापन सुरू आहे. निपुण अध्ययनस्तर कृती कार्यक्रमही सुरू आहे. उपक्रम राबविताना अडचणी येत आहेत.

### अहवाल तयार करून सादर करण्याचे आहेत निर्देश

सर्व शाळांना या मोहिमेत सहभागी होण्याचे निर्देश देण्यात आले. विद्यार्थी व पालकांनी सहभागी होऊन प्रोत्साहन देण्यात यावे, पोषण पंधरवडा काळात शाळांनी राबविलेल्या उपक्रमाचा अहवाल तयार करण्यात यावा, यात आयोजित केलेल्या उपक्रमाची माहिती, सहभागी विद्यार्थी, पालकांची संख्या व इतर उल्लेखनीय बाबींचा समावेश करण्यात येऊन अहवाल सादर करण्याचे निर्देशही आहेत.

# जिल्हा कचेरीवर शहर व जिल्हा काँग्रेसची निदर्शने

## जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर :मोदी शासनाच्या द्वेषपूर्ण व सूडबुद्धीने केलेल्या कारवाईचा निषेध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८अमरावती**




केंद्र शासनाने अलीकडे चालविलेल्या द्वेषपूर्ण व सूडबुद्धीने केलेल्या कारवाईचा निषेध करण्याकरिता शुक्रवारी शहर व जिल्हा काँग्रेसच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली तसेच याबाबतचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी यांना सुपूर्त करण्यात आले, जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख खासदार बळवंत वानखडे व शहराध्यक्ष बबलू शेखावत यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले,

मोदी शासनाने द्वेषपूर्ण भावनेतून व सूडबुद्धीने नॅशनल हेराल्ड या वृत्तपत्राची मालमत्ता मनमानी पद्धतीने जप्त केली. तसेच काँग्रेस नेत्या खा. सोनिया गांधी, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी व इतर ज्येष्ठ नेतेमंडळी विरुद्ध सत्तेचा दुरुपयोग करून कोर्टामध्ये चार्जशीट दाखल करण्याचा मोदी सरकारचा निर्णय हा लोकशाही परंपरेला घातक आहे. या अन्यायकारक निर्णयाच्या विरुद्ध राज्यस्तरावर काँग्रेसच्या वतीने आंदोलन केले जात आहे अशा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शुक्रवारी दुपारी बारा वाजता निदर्शने करण्यात आली, यावेळी केंद्र शासनाच्या वतीने घोषणाबाजी देखील करण्यात आली, या आंदोलनात जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख ,खासदार बळवंत वानखडे, शहराध्यक्ष बबलू शेखावत ,माजी महापौर विलास इंगोले, मिलिंद चिमोटे यांच्यास, हरिभाऊ मोहोड ,सुधाकरराव भारसाकळे, बाळासाहेब हिंगणीकर, दयारामजी काळे, मुकद्दर खा पठाण,नामदेवराव तनपुरे, किशोरभाऊ देशमुख, संजयराव लायदे,विनोदभाऊ पवार, राहुल येवले,प्रदीप देशमुख, ईश्वर बुंदिले,अमोल चिमोटे, भैय्यासाहेब मेटकर, सहदेव बेलकर,महेंद्रसिंग गैलवार, राजाभाऊ हाडोळे, सच्चिदानंद बेलसरे, सागर देशमुख, विलास बोरेकर, मिर्झा जहीर बेग, हरीश मोरे, अमोल बोरेकार, कैलास आवारे,सुधीर रहाटे,बिट्टू मंगरुळे,सिद्धार्थ बोबडे,विठ्ठल सरडे, पंकज मोरे,भाई देशमुख, निलेश डागे, राजाभाऊ बंड, मनोज देशमुख, अभय देशमुख,नरेंद्र मकेश्वर, अरुण गनथडे, मोहन सिंघवी,विदर्भकुमार बोबडे,शिवदास येवले आदींची उपस्थिती होती.

### अन्यथा तीव्र आंदोलन

केंद्र शासनाने अलीकडे हुकूमशाही चालवलेली आहे, विरोधकांचा आवाज दाबण्याचा प्रयत्न सुरू असून त्यांच्यावर कारवाई देखील केली जात आहे ,त्यामुळे या प्रकाराच्या विरोधात आता काँग्रेस रस्त्यावर उतरली असून शासनाविरोधात निदर्शने केली जात आहे ,केंद्र शासनाने हा प्रकार न थांबवल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करू

**बबलू देशमुख जिल्हाध्यक्ष काँग्रेस कमिटी**

# मोहफुले संकलनाचा हंगाम पोहोचला अंतिम टप्प्यात : महिनाभराचा रोजगार : पहाटेपासूनच लगबग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८मेळघाट**

वसंत ऋतूत मोहफुले संकलनातून गावकऱ्यांना बेरोजगारीच्या काळात हंगामी रोजगार उपलब्ध होत आहे. मार्च महिन्याच्या पंधरवड्यापासून पिवळे सोने म्हणून ओळखली जाणारी मोहफुले पडू लागली आहेत. ती मोहफुले गोळा करण्यासाठी नागरिक अगदी सकाळपासूनच शेतशिवारात व जंगलपरिसरात जातात. मात्र, मोहफुलांचा हंगामी रोजगार आता महिन्याभराचा काळ उलटल्यानंतर अंतिम टप्प्यात आला आहे.

जल, जमीन, जंगल ह्या गोष्टीत परिपूर्ण असलेला हा मेळघाट वनराईने परिपूर्ण आहे. त्यातच तालुक्यातील परिसर घनदाट जंगलाने वेढलेला आहे. जंगलात अनेक झाडांपैकी मोहफुलाचे झाड एक विशिष्ट झाड म्हणून संबोधले जाते. जंगलात मोहफुलांची लहान-मोठी असंख्य झाडे आहेत. मोहफुलांपासून दारू निर्मिती होते, है एक वेगळे कारण वगळले तर मोहफुलांपासून होणाऱ्या फळांपासून औषधीयुक्त, पाळीव व रानटी जनावरांना उपयुक्त खाद्य मिळते, जे महत्त्वाचे आहे.




**मिळतो हंगामी रोजगार**

पहाटेच्या सुमारास उष्णतेमुळे मोहफुले जमिनीवर गळून पडली की, ती वेचून टोपल्यांमध्ये एकत्रितपणे साठवण करून घरी आणली जातात. घरी आल्यानंतर ती मोहफुले अंगणात किंवा स्वच्छ मोकळ्या जागेत सुकविली जातात. तीन-चार दिवस उन्हात वाळवून मोहफुले विक्रीयोग्य झाली की, या मोहफुलांची विक्री केली जाते. अडीचशे ते तीनशे कुटुंबांना मार्च ते एप्रिलदरम्यान हंगामी रोजगार मिळत असतो.

**मोहफुलाचे झाड बहुपयोगी**

मोहाची झाडे नैसर्गिकरीत्या बरीच मोठी होत असतात. या झाडांना खत, पाणी लागत नाही. पूर्वी मोहफुलांच्या झाडांच्या पानांपासून पत्रावळी व द्रोण तयार करायचे. मोहाच्या फळांपासून तेलही काढले जाते. प्राचीन लोक मोहफुलांपासून बनविलेल्या राबचा वापर जेवणात करायचे. एवढेच नव्हे तर, मोहफुले गाय, बैल, म्हैस आदी प्राण्यांनाही खायला दिले जाते. मोहफुलाचे विविध फायदे आहेत.

# सिमेंट रस्ते दिव्यांगासाठी अडचणीचे उच्च न्यायालयात याचिका दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१८नागपूर**

शहरात वेगाने सिमेंटच्या रस्त्याचे निर्माणकार्य होत आहे. साधारण रस्त्याच्या तुलनेत सिमेंट रस्त्यांची उंची जास्त आहे. सिमेंटच्या असमान रस्त्यांमुळे दिव्यांगाना अडचणीचा सामना करावा लागतो. यामुळे दिव्यांग कायदा, २०१६ मधील तरतुदींचे उल्लंघन होत असून दिव्यांगांच्या कायदेशीर अधिकारावर गदा येत असल्याचा आरोप मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल जनहित याचिकेत करण्यात आला. दिव्यांग कायद्यातील तरतुदीनुसार सर्वसमावेशक रस्त्यांची निर्मिती करण्याबाबत महापालिकेला सूचना देण्याची विनंती याचिकाकर्त्यांने न्यायालयाने केली.

धंतोली नागरिक मंडळाच्यावतीने याबाबत उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. याचिकेवर न्या. नितीन सांबरे आणि न्या. वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. धंतोली परिसरात महापालिकेच्यावतीने रस्त्यांचे सिमेंटीकरण केले जात आहे. सिमेंटचे रस्ते तयार केल्यामुळे त्यांची उंची वाढली आणि परिसरातील घरात पाणी शिरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.